उत्कृष्ट क्वालिटी
आषाढी एकादशी निमित्त
राजगीरा पीठ १६० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२९२ ■ शनिवार २५ जुलै २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26







सी.जे.पी.शी. ना.नड्डांची चर्चा

## पेपरफुट रोखण्यासाठी पुढील आठवड्यात विधेयक दोषींना दहा वर्षे पर्यंत कारावास, दहा कोटी रुपये दंड





**नवी दिल्ली, दि. २४ : देशभरात नीट पेपरफुटीवरुन विद्यार्थी आणि पालकांमध्ये असंतोष आहे. दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीने उभारलेल्या आंदोलनात सर्वजण सहभागी होत आहेत. एकीकडे दिल्लीतील आंदोलन होत असून दुसरीकडे सरकारकडून आंदोलन मागे घेण्याची विनंती केली जात आहे. त्यातच सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी सव्वीस दिवसांपुर्वी सुरू केलेले उपोषण मध्यरात्री मागे घेतले. तरी आंदोलन सुरूच राहणार असल्याचे कॉक्रोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दीपके यांनी म्हटले आहे. संसदेत विरोधक याच मुद्द्यावरुन आक्रमक झाल्यानंतर संसदेचे दोन्ही सभागृह सोमवारपर्यंत तहकूब करण्यात आले आहेत. मात्र, केंद्रीय कॅबिनेटमध्ये पेपरफुट रोखण्यासाठी नवा कायदा आणण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी पुढील आठवड्यात विधेयक मांडले जाणार असून कायदा अस्तित्वात येईल. या कायद्यानुसार दोषीला दहा वर्षे कारावास आणि दहा कोटीचा दंड असणार आहे.**

दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनानंतर सरकार गंभीर बनले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वत: ट्विट करत नीट पेपरफुटीप्रकरणातील दोषींवर सक्त कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. पेपर फुटीबाबत सक्त कायदा आणण्यात येईल, असेही मोदींनी म्हटले होते. त्याच पार्श्वभूमीवर आज केंद्रीय कॅबिनेटमध्ये पेपर फुटीसंदर्भात नव्याने कायदा आणण्यास मंजुरी देण्यात आली. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील कॅबिनेटमध्ये पेपर फुटीसंदर्भातील कायदा आणखी सक्त (पान ४ वर)

आदित्य-अमित ठाकरे एका मंचावर

### दादरला विद्यार्थी एकवटले दिल्लीच्या आंदोलनास पाठींबा

मुंबई, दि. २४ : दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी मुंबईतील दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्कमध्ये आंदोलनाला सुरुवात झाली आहे. विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी झाले आहेत. मुंबई आणि परिसरातील हजारो विद्यार्थी या ठिकाणी जमले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या आंदोलनात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे आणि मनसे नेते अमित ठाकरे सहभागी झाले आहेत. विद्यार्थी आंदोलनाच्या समर्थनार्थ आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे शिवाजी पार्क परिसरात मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. दरम्यान, आंदोलनाचा (पान ४ वर)

## बनावट शालार्थ प्रकरण, एकशेसाठ को.च्या फसवणूकीत तत्कालीन शिक्षणाधिकारी हिंगोणीकरला धुळ्यातून अटक

**धुळे, दि. २४ (प्रतिनिधी) : बनावट शालार्थ आयडी आदेशाच्या आधारे शासनाची आर्थिक फसव्रणुक केल्या प्रकरणी तपास यंत्रणेने आज धुळ्यातून तत्कालीन शिक्षणाधिकारी शशिकांत भाऊराव हिंगोणीकर यास अटक करण्यात आली आहे. हिंगोणीकर हा जळगाव येथे २०११ ते २०१५ या काळात शिक्षणाधिकारी म्हणून कार्यरत होता. या काळात त्याने २५९ शिक्षक आणि शिक्षकेत्तर यांच्या वैयक्तिक मान्यतेचे कोणतेही प्रस्ताव नसताना बनावट वैयक्तिक मान्यता प्रदान केल्याचे तपासत निष्पन्न झाले होते. त्यामुळे तपास यंत्रणा त्याचा शोध घेत होती. तपासत हिंगोणीकर हा धुळ्यात राहत असल्याची माहिती पथकास मिळाली म्हणून पथकाने त्यास ताब्यात घेऊन नाशिक येथे नेले.**

नाशिकरोड पोलीस ठाण्यात गु.र.क्रं. २१६/२०२६ मध्ये भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३१६ (२), ३१६ (५), ३३६(२), ३३८, ३४०(२), ६१(२), १११, ३(५), २२९, २३८ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६, ६६ (क), ६६ (ड) अन्वये प्रमाणे १२ मार्च २०२६ रोजी नाशिक उपसंचालक कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक या विभाअंतर्गत येणाऱ्या नाशिक, जळगांव, धुळे नंदुरबार येथील ८४१ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे कोणतेही वैयक्तीक मान्यता व शालार्थ प्रस्ताव नसतांना मागील तारखेच्या नियुक्त्या दाखवुन बनावट शालार्थ आदेशाच्या आधारे, शालार्थ प्रणालीत शालार्थ ड्राफ्ट भरुन घेवुन वेतन व थकबाकी रक्कम प्राप्त करुन घेवुन शासनाची १६० कोटींची आर्थिक फसवणुक केली म्हणुन संबंधित मुख्याध्यापक, संस्थाचालक, तत्कालीन शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, वेतन अधिक्षक व संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयाचे तपासात अद्याप पायेतो सुमारे एक हजार २०० आरोपी निष्पन्न झाले आहेत

अटक करण्यात आलेला संशयित आरोपी शशिकांत भाऊराव हिंगोणीकर (वय ६६वर्षे, सेवानिवृत्त शिक्षण अधिकारी रा. निर्मला रेसिडेन्सी, फलॅट नं, ९, भिकनचंद जैन नगर, पिंपराळा रोड, जळगाव) हा जळगाळ जिल्हा परिषद येथे सन २०११ ते २०१५ या कालावधील माध्यमिक शिक्षण (पान २ वर)

आ.अनुप अग्रवालांच्या हस्ते विधिवत प्रतिष्ठापना

## छत्रपती शिवरायांचा एकवीस फुटी पुतळा स्थानापन्न खंडपीठाची स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने उठविली





**धुळे, दि.२४- येथील मालेगाव रोडवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या ठिकाणी आज आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला धुळेकरांना प्रतीक्षा असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. धुळेकरांच्या स्वप्नातील छत्रपती शिवरायांचा एकवीस फूट उंच पूर्णाकृती पुतळा या जागेवर विराजमान होत असल्याचे आम्हाला विशेष समाधान आणि आनंद आहे. धुळेकरांनाही नक्कीच याचा आनंद होईल, असा विश्वास शहराचे आ.अनुप अग्रवाल यांनी व्यक्त केला.**

येथील मालेगाव रोडवरील जुन्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या ठिकाणी एकवीस फूट उंच छत्रपती शिवाजी महाराजांच्या (पान ४ वर)

### हिमाचल मध्ये दरड कोसळली चिमुकलीसह तेरा जागीच ठार

सिमला, दि. २४ : हिमाचल प्रदेशात उदयपूर-किलाड रस्त्यावरील काडू नाल्याजवळ झालेल्या भूस्खलनात डोंगरावरून दगड कोसळून सुमो गाडीवर धडकला. या अपघातात चालकासह तेरा जणांचा मृत्यू झाला, तर दोघे जण जखमी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, सुमो वाहन कुल्लूहून पांगीकडे जात होते. चालकासह वाहनात पंधरा जण होते.

काडू नालाजवळील डोंगरावरून दगड कोसळला. जो वाहनावर आदळल्याने मोठे नुकसान झाले. मृतकांमध्ये चालक बीरसिंग यांचा समावेश आहे. हा अपघात लाहौल-स्पिती जिल्ह्यात घडला. जखमींना (पान ४ वर)

## सोनम वांगचुक यांचे उपोषण मागे मंत्री नड्डा, जितेंद्रसिंह यांची शिष्टाई

**नवी दिल्ली, दि. २४ : राजधानी दिल्लीत सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी अखेर २६ व्या दिवशी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांची भेट घेतल्यानंतर वांगचुक यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला. गुरूवारी मध्यरात्री मंत्र्यांनी रूग्णालयात जाऊन वांगचुक यांच्याशी चर्चा केली आणि त्यांना लिंबूपाणी देत त्यांचे उपोषण सोडवत यशस्वी शिष्टाई केली. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणात जबाबदारी स्विकारात धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सोनम वांगचुक यांच्यासह कॉक्रोच जनता पार्टीचे अभिजीत दीपके यांनी केली आहे.**

दिल्लीतील आंदोलनाला हिंसक



वळण लागल्यानंतर पोलिसांकडून झालेल्या लाठीमारच्या विरोधात विद्यार्थ्यांसह सर्वस्तरातून रोष वाढला आहे. परिणामी, कॉक्रोच जनता पक्षाच्या या आंदोलनाला आता देशभरातून समर्थन मिळत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पेपरफुटी (पान ४ वर)

### दगड मारून जखमी केले कारावास आणि दंडाची शिक्षा

धुळे दि. २४ -शेताच्या बांधावरील लिंबाचे झाड छाटू नको असे समजावून सांगणाऱ्या शेजाऱ्यावर रागाच्या भरात शिवीगाळ करत दगडाने वार करून जखमी करणाऱ्या आरोपीस धुळे येथील प्रथम वर्ग न्यायमूर्ती मा. परवेश साहेब यांनी सहा महिने साध्या कारावासाची आणि दहा हजार रुपये दंडाची सक्त शिक्षा सुनावली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. २१ मे २०२४ रोजी बोरीस (ता. धुळे) येथील रहिवासी फिर्यादी महेश अशोक पाटील हे आरोपी नरेंद्र निंबा वाघ (रा. बोरीस) याला त्यांच्या शेताच्या बाजूला असलेले लिंबाचे झाड छाटू नकोस, असे शांतपणे समजावून सांगत होते. (पान ४ वर)

## नंदुरबार रेल्वे फाटका पलीकडे न.पा.ने स्मशानभूमी उभारावी- जनतेची मागणी



**नंदुरबार, दि.२४(प्रतिनिधी) - शहराच्या चारही दिशेला नवीन वसाहतींचा विस्तार वाढला आहे. निम्मे शहर रेल्वे फाटका पलीकडे वाढले असून या भागात आधुनिक विद्युत दाहिनी चा समावेश असलेली स्मशानभूमी उभारण्याची मागणी भाजपा कार्यकर्ते गिरीश नाथानी यांनी केली आहे.**

यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी आणि नंदुरबार नगर पालिकेचे मुख्याधिकारी व नगराध्यक्षा यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, नंदुरबार जिल्हा निर्मिती नंतर शहराच्या लोकसंख्येत आणि रहिवासी क्षेत्रात देखील वाढ झाली आहे. गेल्या शंभर वर्षाहून अधिक काळापासून साक्री रोडवरील दंडपाणेश्वर मंदिर रस्त्यावर स्मशानभूमी आहे. कोरोना काळात नगर पालिकेने याच ठिकाणी नवीन

स्मशानभूमी उभारली. या ठिकाणी असलेल्या दाहीनी देखील आता कमी पडू लागल्या आहेत. या ठिकाणी देखील स्नागृहासह शौचालय, पिण्याचे पाणी व अनेक सुविधांचा अभाव असून नगर पालिकेने लक्ष देणे गरजेचे आहे. संपूर्ण शहरासाठी असलेल्या एकमेव स्मशानभूमीत देखील मोठ्या प्रमाणावर लाकडाचा वापर होत असतो. मात्र यावर पर्याय म्हणून विद्युत दाहिनी उभारण्यात यावी. तसेच रेल्वे फाटका पलीकडील अनेक नागरिकांना स्मशानभूमी लांब अंतरावर पडत असल्याने गैरसोयीचे ठरत आहे. रेल्वे फटका पलीकडे एक ते सहा प्रभाग असून वाघोदा, पातोंडा, नळवा शिवारातील तसेच एकता नगर, सिंधी (पान ४ वर)


**दिपक ज्वेलर्स**

सोने- 22 K -1,31,450 रु.+3% GST
सोने- 24 K -1,43,500 रु.+3% GST
चांदी- 2,26,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


### विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ रविवारी धुळ्यात मोर्चा

धुळे, दि.२४- दिल्लीत जंतर-मंतर येथे शांततेच्या मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी आणि तरुणांवर निर्दयपणे लाठी हल्ला करण्यात आला मुलांची डोकी फोडण्यात आली आणि हे आंदोलन चिरडून टाकण्यासाठी सरकारकडून दडपशाही सुरू आहे जंतर मंतर येथील आंदोलनावर विद्यार्थी ठाम आहेत. भारतातील प्रत्येक राज्यात घराघरात हे आंदोलन विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी पेटून उठले असून विद्यार्थ्यांच्या आंदोलनाप्रती सरकारचा असलेला दुजाभाव विद्यार्थ्यांचा राग व रोष आणि असंतोषाची वाट (पान ४ वर)

## दक्षिणकाशी प्रकाशाला सिंहस्थ कुंभमेळा पूर्वतयारीला वेग रस्ता मॅपिंग व सर्व्हे सुरू

**शहादा, दि.२५ (प्रतिनिधी)- दक्षिणकाशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शहादा तालुक्यातील प्रकाशा येथे आगामी सिंहस्थ पर्वणीच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय विकासकामांना मोठा वेग मिळाला आहे. सिंहस्थ पर्वणी आणि ध्वजारोहण सोहळ्याच्या निमित्ताने निघणाऱ्या भव्य मिरवणुकीच्या मार्गांवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्वालिटी कंट्रोल टीमकडून रस्ता मॅपिंग व**



**मोजणीचे काम वेगाने सुरू करण्यात आले आहे.**

लाखोंच्या जनसमुदायासाठी भव्य सोहळा दर बारा वर्षांनी गोमाई नदीच्या तीरावर वसलेल्या ऐतिहासिक गौतमेश्वर महादेव मंदिर परिसरात सिंहस्थ कुंभमेळा आणि पर्वणी सोहळा अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. या सोहळ्यासाठी देशभरातून लाखो भाविक प्रकाशा नगरीत दाखल होतात.

सिंहस्थ ध्वजाचे मानकरी असलेल्या स्थानिक गढी परिवाराच्या निवासस्थानापासून या भव्यदिव्य ध्वज रथाची मिरवणूक काढण्यात येते. ही मिरवणूक संपूर्ण गावातून अंदाजे तीन ते साडेतीन किलोमीटरच्या मार्गावरून मार्गस्थ होते. लाखो भाविकांच्या उपस्थितीत रात्रभर चालणाऱ्या या मिरवणुकीनंतर शुभ मुहूर्तावर ध्वज सकान आणि ध्वजारोहणाचा मुख्य सोहळा पार पडतो. भाविक आणि मिरवणुकीच्या (पान २ वर)

## फसवणूकीची रक्कम बँक खात्यात लपविणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**नंदुरबार, दि.२४ (प्रतिनिधी)- फसवणूकीची रक्कम स्विकारण्यासाठी बँक खात्याचा वापर केल्याप्रकरणी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात दोन जणांविरुद्ध तर शहर पोलिस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या तिघांनी आपल्याच बँक खात्याचा वापर करीत रक्कम लपविल्याचा प्रकार उघडकीस आला.**

नंदुरबार तालुक्यातील रनाळे येथील सेंट्रल बँक ऑफ इंडीया या बँकेत खाते असलेल्या जयेश पावबा सावळे (रा. नंदाळे, ता.धुळे) याने फसवणूकीची रक्कम स्विकारणे व लपविण्यासाठी आर्थिक फायद्याकरीता स्वतः च्या बँक खात्याचा वापर केला. यात आठ हजार रुपयांचा व्यवहार करण्यात आला. हा प्रकार उघडकीस आल्याने पोलिस हवालदार प्रमोद गुलाबराव सोनवणे यांनी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार जयेश पावबा सावळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हेकॉ. संजय मनोरे (पान २ वर)

## फसव्या जाहिरातीला दोघे बळी पडले बंदुकीच्या धाकाने तिस हजार लुटले

**धुळे, दि.२४ - जळगांव जिल्ह्यातील दोघा भावांना बंदुकीचा धाक दाखवून लुटल्याची घटना जामदा (ता. साक्री) परिसरात घडली. सोशल मीडियावरील जाहिरात पाहून दोघांची फसवणुक झाल्याचे दिसून आले. याप्रकरणी निजामपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.**

रोटवद (ता. धरणगाव) येथील दुर्गेश रवींद्र पाटील (वय २३) विद्यार्थी सोशल मीडियावरील फसवणुकीच्या जाहिरातीला बळी पडला. जाहिरात पाहून तो भावासह १८ जुलैस साक्री तालुक्यात आला होता. यावेळी त्या जाहिरातीशी संबंधितांनी दोघा भावांना जामदा शिवारात बोलावले. तेथुन त्यांना निर्जन स्थळी टेकडीवर पवनचक्की जवळ बोलावून घेतले.

त्याठिकाणी आधीच दबा धरून बसलेल्या (पान ४ वर)

### नंदी बैल चोरणाऱ्या तिघांना केले जेरबंद

धुळे, दि.२४- शहरातील चाळीसगाव रोड पोलीस ठाणे हद्दीतून पाळीव नंदीबैल चोरून नेणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली. अन्य दोन संशयित बेपत्ता असून त्यांचाही शोध पोलीस घेत आहेत.

येथील मालेगाव रोड परिसरातील स्वरा पार्वती जोगी (रा. यल्लमा माता मंदिर धुळे) यांच्या मालकीचा ६० हजार रुपये किंमतीचा पाळीव नंदी बैल ६ जुलैस चोरी झाला होता. याप्रकरणी चाळीसगावरोड पोलीस ठाण्यात गुन्हा (पान २ वर)

## कुणाल पाटीलांचे विठ्ठलाकडे साकडे केळीचा महाप्रसाद पंढरपूरकडे रवाना




धुळे,दि.२४ - वरुणराजाने समाधानकारक पाऊस पाडावा आणि शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या जीवनात समृध्दी येऊ दे! सर्वांना सुख समाधान लाभू दे! असे साकडे मा.आ.कुणाल पाटील यांनी पंढरीच्या श्री विठ्ठलाकडे घातले. सामाजिक कार्यकर्ते श्री धर्मराज बागुल यांच्याकडून पंढरपूर येथे भाविकांसाठी अडीच टन केळीचा महाप्रसाद आज रवाना करण्यात आला. यावेळी महाप्रसादाच्या केळीची व वाहनाची विधीवत पुजा मा.आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते करण्यात आली.

उडाणे ता.धुळे येथील सामाजिक कार्यकर्ते श्री धर्मराज बागुल हे पाच वर्षापासून नित्यनियमाने पंढरपूर येथे केळीचा महाप्रसाद घेऊन जात असतात. आषाढी एकादशी हा उपवासाचा पावन दिवस असल्याने वारकऱ्यांना, भाविकांना प्रसाद म्हणून ते केळीचे पंढरपूर येथे वाटप करीत असतात. या वर्षीही श्री धर्मराज बागुल यांच्याकडून तब्बल अडीच टन केळीचा महाप्रसाद (पान ४ वर)




# आपला महाराष्ट्र

## आंदोलन, पाऊस, शेती, माती आणि फुललेली सृष्टी

जंतरमंतरवरील संघर्षाच्या बातम्या, राजकीय आरोप–प्रत्यारोप आणि संसदेतील गदारोळ यांमध्ये देशाचे लक्ष असताना, निसर्ग मात्र आपल्या लयीत सर्वत्र अविरत कार्यरत होता. त्याला प्रसिद्धीची अपेक्षा नाही, घोषणांची गरज नाही. तो शांतपणे भूमीला जीवनदान देत राहतो.तो त्यांचा धर्म आहे आणि तो सतत निभावत असतो.माणूस सोडून सर्वच आपापला धर्म निभावतात माणूस त्यास अपवाद असतो.

सलग कोसळणाऱ्या पावसाने नद्या, ओढे, विहिरी आणि तलाव पुन्हा भरू लागले आहेत. शेतांमध्ये नवजीवन संचारले आहे. हिरवाईने नटलेली धरती जणू आशेचा संदेश देत आहे. जणू ती हिरवा शालू पांघरूण आली आहे.अशा वेळी मनात एक प्रश्न निर्माण होतो आणि तो म्हणजे आपण क्षणिक राजकीय घटनांमध्ये इतके गुंतून जातो की, आपल्या अस्तित्वाचा आधार असलेल्या निसर्गाच्या अनमोल देणगीकडे दुर्लक्ष करीत असतो.राजकारण किंवा त्यातील घडामोडी हा आपल्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य भाग असला तरी खरे सान्निध्य निसर्गाचे असते आणि तेच आपल्याला जगण्याचे बळ देते. राजकारण अस्वस्थता देते तर निसर्ग निखळ आनंद देतो हा मुलभूत फरक आहे.

समाजात संघर्ष आणि मतभेद असतीलच; ते लोकशाहीचा भाग आहेत. पण त्याच वेळी जीवनाला पोसणाऱ्या निसर्गाशी असलेले आपले नातेही तेवढ्याच संवेदनशीलतेने जपले पाहिजे. कारण अखेरीस माणसाचे जीवन राजकारणावर नव्हे, तर पाणी, माती, शेती आणि निसर्गाच्या संतुलनावरच टिकून असते. म्हणूनच रिमझिम कोसळणा–या सरी केवळ पाऊस नसून आशेच्या आणि नवचैतन्याच्या सरी आहेत.त्यांचा आनंद घेता आला पाहिजे.

गेल्या दोन तीन दिवसात कोकण किनारपट्टी, पुणे, नाशिक येथे मुसळधार पावसाचे थैमान होते. पूर्व विदर्भ, मराठवाडा, खान्देश, मध्य प्रदेश आणि दक्षिण भारतातील अनेक भागांत सलग चोवीस तासांहून अधिक काळ झडी लागली होती. मात्र या जीवनदायी पावसाकडे फारसे कुणाचे लक्ष नव्हते.

खरे तर असा मुरलेला, संयत पाऊस शेतीसाठी वरदान असतो. तो पिकांना नवसंजीवनी देतो, विहिरींना पाझर फोडतो आणि भूमीला नवचैतन्य देतो. अशा वेळी नकळत ओठांवर भावगीताच्या ओळी येतात –रिमझिम पाऊस पडे, सारखा पाणीच पाणी चहुकडे.हिंदी चित्रपटसृष्टीतही पावसावर आधारित असंख्य अजरामर गीते आहेत; त्यांचा आस्वाद घेत निसर्गाच्या या उत्सवात मन सहज हरवून जाते.

सध्या सर्वत्र शेते बहरलेली आहेत. हिरव्यागार गवताचा, वेलींनी आणि रानफुलांनी नटलेल्या धरतीचा साज डोळ्यांना सुखावतो. जणू धरणीने हिरवा शालू पांघरला आहे, असे मनोहर दृश्य चहूकडे दिसते.अशा निसर्गसौंदर्याचा आनंद शब्दांत मावणारा नाही; तो अनुभवण्यासारखाच आहे. एका बाजूला मानवी संघर्ष आणि अस्वस्थतेचे चित्र, तर दुसऱ्या बाजूला निसर्गाची शांत, जीवनदायी उधळण.या दोन्ही टोकांच्या वास्तवाचा अनुभव सध्या एकाच वेळी येत आहे.

यमुनेचा तीर डोळ्यासमोर ठेऊन कविंनी पावसाचे वर्णन करतानाच यमुनेला पूर आल्याचे म्हटले आहे.अशा वातावरणात चोहिकडे पाणीच पाणी असताना मोहन म्हणजे कृष्ण कुठे बरे गेला असेल असा प्रश्न यशोदेच्या मनात येतो.तसे वर्णन यि गीतात केलेले आहे.

रिमझिम पाऊस पडे सारखा.<br>
यमुनेलाही पूर चढे<br>
पाणीच पाणी चहूकडे ग बाई,<br>
गेला मोहन कुणीकडे

तरुवर भिजले भिजल्या वेली ओली चिंब राधा झाली, चमकून लवता वरती बिजली दचकुन माझा ऊर उडे ग बाई गेला मोहन कुणीकडे रिमझिम पाऊस पडे सारखा.अशा प्रकारचे काव्य संगीत सातत्याने पावसासोबत झिरपत आलेले आहे.

अनेक कवितांप्रमाणे अशीच एक सुंदर कविता आहे. रिमझिम रिमझिम थेंबांनी भरुन येतो पाऊस, ओल्या मातीच्या गंधाने धुंद होतो पाऊस. मरगळलेल्या मनाला नवी पालवी देतो, मोहरत्या मनाने जणु मल्हार गातो पाऊस. गुपित काहीसे गोड कानी सांगत असतो, एक नाते पाऊलवेडे आपल्याशी बांधत असतो. भिरभिरणाऱ्या वाऱ्यासोबत थैमान घालत असतो, अंगणात पोरांसोबत भन्नाट नाचत बसतो. थेंबाथेंबाने पानापानावर झुलत असतो पाऊस, प्रत्येकच्या मनात कधीतरी असा फुलत असतो. अशी साहित्य क्षेत्राशी पावसाची सलगी आहे.

कविवर्य ग्रेस यांच्या पावसा बद्दलच्या आर्त परंतु अनाकलनीय कविता आहेत.ती जेव्हा गेली तेव्हा त्यांना जे जाणवले ते त्यांनी शब्दबद्ध केलेले आहे.ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता मेघांत अडकली किरणे हा सूर्य सोडवित होता .ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता ,ती आई होती म्हणुनी घनव्याकुळ मी ही रडलो ,त्यावेळी वारा सावध पाचोळा उडवित होता ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता.आई होती त्यामुळे मी रडलो.व्याकुळ घना प्रमाणे असा त्यातून अर्थ निघतो.पाऊस कधीचा पडतो, झाडांची हलती पाने, हलकेच जाग मज आली दु:खाच्या मंद सुरांनी ही त्यांची सुप्रसिद्ध कविता सतत पडणाऱ्या पावसाची आहे. याद्वारे कविच्या मनात असलेली सल दिसून येते.हिंदी चित्रपट सृष्टीत तर पावसाच्या सरी वर सरी कोसळतात तशी गीते बरसत असतात.त्याचे चित्रणही मनमोहक असते. प्यार युवा ईकरिर युवा, टिप टिप बसला पानी, पानी में अंग,एक लडकी भिगी भिगीसी, रिमझिम गिरे सावन, आज रपट जाये तो. नील गगनपर उडते बादल आआआ, धूपमे जलता खेत हमारा कर दे तू छाया, अशी एक ना अनेक गाणी मनमोहून घेतात.

पावसावर मानवी जीवनाचे सगळे काही अवलंबून आहे. एल निनोच्या प्रभावामुळे दुष्काळाची भीती मनात घर करून असताना. पावसाचे आगमन सुखकारकच म्हणावे लागेल. कारण शेतीची अर्थ व्यवस्था पावसावरच अवलंबून असते. हॉटेलात पिझ्झा बर्गर मिळत असले तरी ते पदार्थ बनविण्यासाठी धान्य लागते आणि ते शेतातच तयार होते. याचा विसर पडायला नको.पिण्याचे पाणी, अन्नधान्य विपुल प्रमाणात उपलब्ध झाले तरच मनुष्य जीवन सुखी होईल. संपन्न होईल. केवळ मानवी जीवनच नव्हे तर सगळीच जीवसृष्टी पावसावरच अवलंबून आहे.जनावरांना चारा,पिण्याचे पाणी,शेतीच्या सिंचनासाठी पाणी या मुख्य समस्या पाऊस नसला तर निर्माण होतात. मग सरकार टँकरची व्यवस्था करते. कार्यकर्ते तशी मागणी करतात. ती सुध्दा एक संस्कृती आहे. तिला टँकर संस्कृती म्हणतात.ती पोसली जावी म्हणून अवसरवादी कार्यरत असतात.वाळू तस्कर सुध्दा त्यातलेच. पण ते नदी नाल्यांना पूर येण्याची वाट बघत असतात.कारण त्यामुळे वाळू येते. अशाही गैर मार्गी व्यवसायाशी पावसाचा संबंध असतो. नद्या नाले या दिवसांत भरभरून वाहतात. त्यांच्या काठावरची सृष्टी फुलते.त्यावर जीवसृष्टी पोसली जाते. पाखरे फुलपाखरे उडत असतात, त्यांचा गुंजारव मनाला भावत, यासाठी पाऊस यावा,तो स्थिर व्हावा आणि सगळीकडे आनंदी आनंद व्हिवा अशी निसर्गाप्रती प्रार्थना आहे.

## पेपरफुटीत न्याययंत्रणा कठोर दिल्ली न्यायालयात आज सुनावणी

**नवी दिल्ली, दि. २४ : राजधानी दिल्लीत वीस जुलैस संसद भवनाबाहेर झालेल्या आंदोलनानंतर नीट पेपर फुटी प्रकरणाचा मुद्दा अधिकच चिघळला. लाखोंच्या संख्येने आंदोलक मैदानात उतरले होते. यानंतर या आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचे पाहायला मिळाले. त्याचे परिणाम आता देशभरात दिसू लागले आहेत. प्रकरण आता सर्वोच्च न्यायालयात देखील पोहोचले आहे. आज (दि. २४) पेपरफुटी प्रकरणाची सुनावणी करताना, सर्वोच्च न्यायालयाने यावर भाष्य करताना म्हटले की, हे प्रकरण असेच सोडून देऊ शकत नाहीत. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला सांगितले की ते या संदर्भात अनेक पावले उचलणार आहेत. ते विद्यार्थ्यांच्या हिताबाबत खूप गंभीर असल्याचे निरीक्षण ही त्यांनी यावेळी नोंदवले आहे. पोलीसांवर हल्ले व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान यावर फौजदारी कारवाईची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेणार आहे.**

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की, आम्ही विद्यार्थ्यांच्या हिताबाबत खूप गंभीर आहोत. राधाकृष्णन समितीच्या अहवालाची अंमलबजावणी केली जाईल. परंतु, सरकार यापलीकडेही पावले उचलेल. अनेक गोष्टी घडणार आहेत. सॉलिसिटर जनरल तुषार यांनी न्यायालयाकडे एका आठवड्याचा वेळही मागितला. ते म्हणाले की ते न्यायालयाला सविस्तर माहिती देतील. तर सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी करताना म्हटले की, ठीक आहे. आम्हालाही संपूर्ण यंत्रणा निर्दोष हवी आहे. कृपया आपले उत्तर दाखल करावे आणि सुनावणी सोमवारी (३ ऑगस्ट) रोजी होईल. असे यावेळी सांगण्यात आले. पीटीआयच्या वृत्तानुसार, सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला सांगितले, सायबर सुरक्षा आणि डेटा संरक्षणासंदर्भात केंद्र सरकारने कठोर पावले उचलावीत, अशी आमची अपेक्षा आहे. नीट पेपरफुटी प्रकरणासंदर्भात उचललेल्या पावलांवर न्यायालय लक्ष ठेवेल, असेही न्यायालयाने म्हटले.

उच्च न्यायालयात आज सुनावणी

दिल्ली उच्च न्यायालय उद्या दुपारी अडीचला जंतरमंतर आंदोलन दरम्यान पोलीस कर्मचाऱ्यांवर हल्ला करणाऱ्या आणि सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांवर फौजदारी कारवाईची मागणी करणाऱ्या याचिकेवर सुनावणी घेणार आहे. हे प्रकरण दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश प्रतीक जालान यांच्या एकल खंडपीठासमोर होते. न्यायाधीश प्रतीक जालान यांनी सांगितले की, ही याचिका जनहित याचिकेच्या स्वरूपाची असून, त्याच विषयावरील संबंधित याचिकेसह आज सरन्यायाधीशांसमोर त्यावर सुनावणी व्हायला हवी. सुनावणी दरम्यान, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला माहिती दिली की, याच घटनेशी संबंधित अशीच एक जनहित याचिका सरन्यायाधीशांसमोर प्रलंबित आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने विचारले, ही जनहित याचिका आहे का? जेव्हा तुमच्याकडे वैयक्तिक अधिकार नसतो, तेव्हा तुम्ही ती जनहित याचिका म्हणून दाखल केली पाहिजे.



## चिमुकल्यांच्या अखंड विठ्ठल नामाने भारावला हस्ती पूर्व प्राथमिक शाळा

**दोंडाईचा,दि.२४-विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल! या अखंड नामघोषाने हस्ती पूर्व प्राथमिक शाळेचा परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला. शाळेचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली आषाढी एकादशी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या या विशेष उपक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचा आनंद अनुभवत भारतीय संस्कृती, संस्कार आणि सामाजिक मूल्यांचे सुंदर दर्शन घडविले.**

कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणी यांच्या मूर्तींच्या मंगल आगमनाने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी पूजन करून अभंगगायन, ओव्या, फुगडी नृत्य, अश्व रिंगण, संत पुंडलिक यांच्यावरील आईवडीलांची सेवा हीच विठू सेवा ही नाटिका सादरीकरण तसेच स्वच्छता वारी या पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण केले. या विविध उपक्रमांमधून वारकरी परंपरेचे महत्त्व, संतपरंपरेचे विचार, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीचा प्रभावी संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

या प्रसंगी नऊवारी साडी, झब्बा-कुर्ता आणि धोती-कुर्ता अशा पारंपरिक वारकरी वेशभूषेत सजलेले चिमुकले वारकरी सर्वांचेच लक्ष वेधून घेत होते. त्यांच्या निरागस अभिनयाने, भक्तिभावाने आणि उत्स्फूर्त सहभागाने संपूर्ण वातावरण भक्तिरसाने भारावून गेले.

## टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेची निवड चाचणी २६ जुलैला

दोंडाईचा,दि.२४(प्रतिनिधी) - धुळे जिल्हास्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड चाचणी रविवार, २६ जुलै रोजी सकाळी ९ वाजता हस्ती गृप ऑफ स्कूलच्या क्रीडा मैदानावर आयोजित करण्यात आली आहे. जिल्ह्यातील इच्छुक व पात्र खेळाडूंनी मोठ्या संख्येने या निवड चाचणीत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

या निवड चाचणीतून निवड झालेल्या खेळाडूंना २१ ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत धुळे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.

धुळे जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे जिल्हाध्यक्ष कैलास जैन व सचिव विशाल पवार यांनी जिल्ह्यातील सर्व गुणवंत खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी होऊन आपल्या कौशल्याचा ठसा उमटवावा, असे आवाहन केले आहे. तसेच राज्यस्तरीय स्पर्धेत धुळे जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी ही सुवर्णसंधी असल्याचे सचिव विशाल पवार यांनी नमूद केले.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**

### पान १ वरुन

## दक्षिणकाशी प्रकाशा ला सिंहस्थ कुंभमेळा

सुरळीत आयोजनासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरले आहेत. त्यांनी रस्ता मॅपिंग व मोजणी क्वालिटी कंट्रोल विभागाचे कर्मचारी विशेष मोजणी व्हीलचा वापर करून ध्वज मिरवणूक मार्गाची लांबी आणि रुंदी अचूकपणे मोजत आहेत. रस्त्यांची दुरुस्ती, रुंदीकरण आणि इतर आवश्यक विकासकामांचा प्राथमिक अंदाज काढण्यासाठी सर्व्हेक्षणाचे काम वेगाने सुरू आहे.

लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांची कोणतीही अडचण होऊ नये, तसेच मिरवणूक मार्ग अडथळामुक्त राहावा, यासाठी प्रशासनाने आतापासूनच कंबर कसली आहे. पूर्वतयारीचा भाग म्हणून सुरू असलेल्या या सर्वेक्षणाने सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीला खऱ्या अर्थाने गती मिळाली असून ग्रामस्थांमध्ये व भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

## नंदी बैल चोरणाऱ्या तिघांना केले जेरबंद

दाखल झाला. सहाय्यक निरीक्षक विवेक पवार यांना गोपनिय माहिती, सी.सी.टी.व्ही. फुटेज मधील संशयीतांच्या हालचालींवरुन महंमद अबीद महंमद हारुण अन्सारी ऊर्फ मुन्ना काल्या (रा. जनता सोसायटी, धुळे), जुल्फेकार महंमद हसन अन्सारी, (रा. हाजी नगर, वडजाईरोड, धुळे), अन्सारी उमेर महंमद शरीफ (रा. अक्सानगर, वडजाईरोड, धुळे) यांना ताब्यात घेत कसून चौकशी केली असता त्यांनी गुन्हयाची कबुली दिली. पाळीव नंदी बैल चोरुन रफीक काल्या व त्याचा अनोळखी साथीदार यांना १८ हजार रुपयात विक्री केल्याचे सांगीतले. पाळीव नंदी बैल चोरणाऱ्या तीन आरोपींना अटक करुन चाळीसगावरोड पोलीसांनी पशुधन चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. अन्य संशयित रफीक काल्या, त्याचा अनोळखी साथीदार तसेच पाळीव नंदी बैल यांचा शोध घेण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली चाळीसगावरोड पोलीस ठाणेचे सहायक निरीक्षक विवेक पवार, हवालदार मनोज पाटील, अतीक शेख, शोएब बेग, सचिन पाटील, सिराज खाटीक, इंद्रजित वैराट यांनी कारवाई केली.

## बनावट शालार्थ प्रकरण, एकशेसाठ को.च्या फसवणूकीत

अधिकारी म्हणून नेमणुकीस होता. त्यावेळी त्याने जळगाव जिल्हयातील एकुण २५९ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांचे वैयक्तीक मान्यतेची कोणतेही प्रस्ताव शिक्षणाधिकारी कार्यालयात प्राप्त नसतांना बनावट वैयक्तीक मान्यता प्रदान केलेल्या आहेत, असे तपासात निप्पन्न झाले आहे. त्या अनुषंगाने गोपनीय बातमीदार व तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे आरोपी शशिकांत हिंगोणीकर हा धुळे येथे असल्याची माहिती प्राप्त झाली. तपास अधिकारी तथा गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलिस आयुक्त संदिप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट क चे सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक मनोहर शिंदे, नंदकुमार नांदुळीकर, पोलिस कर्मचारी चंद्रकांत गवळी, तेजस मते, सुनिल खैरनार यांनी धुळ्यातील संशयित ठिकाणी तपास करीत हिंगोणीकर यास ताब्यात घेतले.

## फसवणूकीची रक्कम बँक खात्यात

करीत आहेत. तसेच नंदुरबार तालुक्यातील भागसरी येथील संतोष विजय भिल याने खोंडामळी येथे सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखेत असलेल्या आपल्या बँक खात्याचा वापर फसवणूकीची रक्कम स्विकारण्यासाठी केला. यात त्याने १० हजार रुपयांचा व्यवहार करीत सदर रक्कम लपविण्याचा प्रकार केल्याचे उघड झाले. याबाबत पोलिस हवालदार चंद्रशेखर रमेश बडगुजर यांनी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार संतोष विजय भिल याच्याविरुद्ध गून्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हेकॉ. सरवरसिंग वसावे करीत आहेत.

शहादा येथील दत्त कॉलनी राहणारे परियानी साजिद रहीमभाई याने नंदुरबार येथील एचडीएफसी बँक खात्याचा फसवणूकीची रक्कम स्विकारणे व लपविण्यासाठी वापर केला. आपल्याच बँक खात्यात एक लाख १५ हजार रुपये धनादेशाद्वारे काढण्यासाठी वापर केल्याचे उघड झाले. याबाबत पोशि. सुभाष रायका वळवी यांनी नंदुरबार शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुयार परियाणी साजिद रहीमभाई याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास सायबर सेलचे पोलिस निरीक्षक राजेंद्र जगताप करीत आहेत.


* धुळे, दि.२४- देवपूर वलवाडी सिंचाई कॉलनीतील विठ्ठलधाम येथे आषाढी एकादशी निमित्त आज दि.२५ जुलै रोजी यात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी महाआरती नगरसेवक विजय देवरे, दुपारी बारा वाजता महाआरती इंजि.ललित देवरे, सायंकाळी महाआरती मनिष बाळासाहेब बोरसे तसेच रात्री ८ वाजता ह.भ.प.समाधान महाराज यांचे किर्तन होणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन मुख्य विश्वस्त अॅड. किशोर जाधव यांनी केले आहे.

## महिलांची मशरूम शेतीत यशस्वी वाटचाल: प्रत्यक्ष रोजगार सुरू झाला

शहादा, दि.२४(प्रतिनिधी)- अक्कलकुवा तालुक्यातील देवमोगरा नगर पुनर्वसन येथे मशरूम शेती व्यवसायिक मार्गदर्शक राजेंद्र वसावे व लीलाताई वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली नंदुरबार जिल्ह्यातील महिलांची मशरूम शेतीत यशस्वी वाटचाल सुरू झाली आहे.

मशरूम शेतीचे मार्गदर्शक राजेंद्र वसावे व लीलाताई वसावे यांच्या मार्गदर्शनाखाली सौ.किरताबाई चंदा वसावे, सौ.इंदिराबाई बावा वसावे, सौ. मीनाताई जमश्या तडवी, सौ. उषा वसावे तसेच अनेक महिलांनी यशस्वीपणे मशरूम लागवड सुरू केली आहे. सौ. किरताबाई चंदा वसावे यांच्या मशरूमचे उत्पादन विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. मशरूम लागवडीपासून उत्पादन, तोडणी, पॅकेजिंग, विक्री, पार्सल तसेच कॅनोपी स्टॉलद्वारे थेट विक्री करण्याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन दिले जात आहे. यासोबतच कृषी विभाग (आत्मा) व कृषी विज्ञान केंद्र यांचेही वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन लाभत आहे. मशरूम उत्पादकांनी सांगितले की, राजेंद्र वसावे हे आमच्या घरी येऊन लागवडीपासून विक्रीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर प्रत्यक्ष मार्गदर्शन करतात. त्यामुळे मशरूम शेती व्यवसाय यशस्वीपणे करता येत असून उत्पन्नात वाढ झाली आहे. कालो कुणबी सेवाभावी संस्थाच्या माध्यमातून राजेंद्र वसावे, लीलाताई वसावे व संपूर्ण टीम प्रत्यक्ष ग्राउंड लेव्हलवर कार्यरत असून महिला, पुरुष, युवक व युवतींना मशरूम शेतीद्वारे रोजगार उपलब्ध करून देत आहे. मशरूम शेतीचा हा उपक्रम नंदुरबारसह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये आणि राज्याबाहेरही विस्तारत असून अनेक कुटुंबे स्वावलंबी होत आहेत.

**प्रकाश में आज इन्कलाब**




विनोद खन्ना, सायरा बानो, विनोद मेहरा, जॉनी, वॉकर, बिंदु, केष्टो मुखर्जी

### शब्दकोडे क्रमांक : २४१९

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | | ■ | ५ | | ६ | ७ |
| ८ | | ■ | ९ | १० | | ■ | ११ | | ■ | १२ | |
| | ■ | १३ | | | ■ | १४ | ■ | १५ | १६ | | ■ |
| ■ | १७ | | | ■ | १८ | | १९ | ■ | | ■ | २० |
| २१ | | | ■ | २२ | | ■ | २३ | २४ | ■ | २५ | ■ |
| | ■ | २६ | | | ■ | २७ | | | २८ | ■ | २९ |
| ■ | ३० | | ■ | ३१ | ३२ | ■ | | ■ | ३३ | ३४ | |
| ३५ | | ■ | ३६ | | | ३७ | ■ | ३८ | ■ | | ■ |
| | ■ | ३९ | ■ | | ■ | ४० | ४१ | | | ■ | ४२ |
| ■ | ४३ | ■ | ४४ | | ४५ | ■ | ४६ | | ■ | ४७ | |
| ४८ | | | | ■ | ४९ | ५० | ■ | ५१ | | | ■ |
| ५२ | | ■ | ५३ | | ■ | ५४ | | | ■ | ५५ | |

**आडवे शब्द :**१.अर्ज ४.रत्न ज्या ठिकाणी मळितात ते ठिकाण ५.वारस नसलेला ८.राग ९.विहिरीतून पूर्वी पाणी काढण्यासाठी वापरायचे ते यंत्र ११.सुर्य फुलांच्या बियांपासून बनवतात ते १२.उजवा-विरूद्ध१३.जास्तीत जास्त मर्यादा असलेला १५. शहर १७.देवाचया पुढे तेवतो दिवा १८.लाकडी पायताणं २०.हिंदीत-का २१.पुन्हा २२.लढाई २३.मेघ २५.नाही-विरूद्ध २६.चांदी २७.पहाटे खिडकीतून येणारे सुर्य किरण ३०.दानी ३१.कालवण ३३.रोमांच ३५.मुडके ३६.समुद्र-हिंदीत ३९.दोन ४०.मनाची घालमेल ४४.वसा ४६.फटाका ४७.ममता ४८.काळजी ४९.फिकीर ५१.एक सुवासिक वनस्पती ५२.बांग्लादेशचे चलन ५३.मनाचा कल ५४.सरकारी अखत्यारीत असलेले शिक्कापत्र ५५.हिंदीत-शतक **उभे शब्द :**१.अखेरची भेट २.पेहराव ३.स्वभावातील मुलायमपणा ४.चारपाई ५.लाटणे ६.एक संदेशवहन प्रणाली ७.एक आणि पाव मिळून तयार होणारी संख्या १०.दैना १३.उणीव १४.मोठा १६.समूह १७.पावसाची झड१८.पक्षी १९.पालघर जिल्हयात आकारास येत असलेले एक बंदर २१.निश्चय २२.महाराजा सवाई जयसिंग यांनी १८व्या शतकात भारतात बांधलेली वेधशाळा २४.किल्ला २८.सोबत २९.मेलेला ३०.कवाड ३२.हाक ३४.लफडा ३५.भाताचा कण ३७.मग्न ३८.एक फळ ४१.टिफ फीन ४२.एक प्रसिद्ध डीश '. . सूप'४३.नात्यात नसलेला ४४.वाहून नेणारा ४५.इंद्रधनुच्या रंगांची एकूण संख्या ४७.मनोदय ४८.जमिनीच्या किंवा खडकांच्या थरांना पडलेल्या घडया ५०.महिना

### शब्दकोडे क्रमांक : २४१८ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गो | विं | दा | ■ | आ | व | ळा | ■ | बे | री | ज | ■ |
| पा | चू | ■ | शे | व | ट | ■ | भा | ल | ■ | ल | ढा |
| ळ | ■ | बे | जा | र | ■ | थो | ■ | गा | ज | ■ | ल |
| का | र | भा | री | ■ | स | र | ग | म | ■ | सु | ■ |
| ळा | ■ | न | ■ | वे | ■ | वी | र | ■ | म | र्या | दा |
| ■ | ओ | ■ | स | द | रा | ■ | म | द | म | स्त | ■ |
| सु | वा | स | ■ | ना | व | ड | ■ | गा | ता | ■ | अ |
| ■ | ळ | ■ | उ | दा | स | ■ | बा | बा | ■ | अ | ट |
| क | णी | स | ■ | यी | ■ | प | ■ | ज | प | णू | क |
| ट | ■ | मा | ता | ■ | मु | नी | म | ■ | री | ■ | ळ |
| ■ | ल | ग | ■ | र | ■ | र | ■ | ह | वा | ला | ■ |
| बी | ■ | म | न | मा | नी | ■ | नी | ■ | र | ड | का |

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS


ता. २३ से रोज १ खेल टा. १२ बजे
(हिंदी मध्ये) धमाल- 4
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS


ता. २३ से रोज ३ खेल टा. २:४५,६,९:१० बजे
(हिंदी मध्ये) जननेता
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.




# ऑनलाईन फसवणूक प्रकरणात नंदुरबारमध्ये तीन गुन्हे दाखल

नंदुरबार, २४(प्रतिनिधी)- **नंदुरबार सायबर पोलीस ठाण्यात ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या रकमेसाठी स्वत:ची बँक खाती वापरल्याप्रकरणी तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**

पहिल्या प्रकरणात, शहादा येथील गरीब नवाज कॉलनी, नूर इलाही नगर येथील अरबाज आरिफ धनानी याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आपल्या बँक खात्यात दोन हजार व एक लाख साठ हजार अशी एकूण एक लाख बासष्ट हजार रूपये फसवणुकीची रक्कम स्वीकारली. त्यानंतर एक लाख साठ हजार चा धनादेश वटवून रोख रक्कम काढल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पोलीस शिपाई देविदास रामदास महाले (वय ४१) यांनी फिर्याद दिली असून पुढील तपास सुरू आहे. दुसऱ्या प्रकरणात, नंदुरबार येथील ओम राकेश मराठे व भावेश मनोज पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इंडियन बँकेतील खात्यांमध्ये अनुक्रमे एकोणावीस हजार पाचशे तेरा व तेहतीस हजार दोनशे अशी एकूण बावन्न हजार सातशे तेरा रूपयांची संशयास्पद रक्कम जमा झाल्याचे तपासात आढळून आले. या प्रकरणी पोलीस हवालदार हितेश भिका पाटील (वय ३८) यांनी फिर्याद दिली असून तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र जगताप करीत आहेत. तिसऱ्या प्रकरणात, शहादा येथील साजिद रहिमभाई याच्याविरुद्ध एच.डी.एफ.सी. बँकेचे खाते फसवणुकीसाठी वापरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस शिपाई सुभाष रायका वळवी (वय ३७) यांनी फिर्याद दिली आहे. तपास हेमंत खाडे करीत असून पुढील कारवाई सुरू आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे चितोड ता.जि. धुळे येथील स.नं.६/१ पैकी प्लॉट नं.३४ चे एकूण क्षेत्र १५०.०० चौ.मी. चा आकार ३ रु.०० पैसे चा बखळ प्लॉट.

| यासी | माषे | चतु:सिमा |
|---|---|---|
| पूर्वेस– | १० मी., | रस्ता ६ मी., |
| पश्चिमेस– | १० मी., | प्लॉट नं.३०, |
| दक्षिणेस– | १५ मी., | प्लॉट नं.३२, ३३, |
| उत्तरेस– | १५ मी., | प्लॉट नं.३५ |

येणे प्रमाणे वरील वर्णनाची आतील मिळकत ही सौ.विना विनायक पुराणिक. रा.धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकीची व ताबेउपभोगातील असून त्यांचाकडून सदर मिळकत या आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ४ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्तयावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्बोज, निर्वेध व सौ.विना विनायक पुराणिक. रा.धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकीची असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही. व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राहय धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधणकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती, अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:– २४/०७/२०२६.
नोटीस देणार तर्फे ॲडव्होकेट

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवाला बिल्डींगजवळ, मिलपरीसर, धुळे.
**मो.नं.९४२२७७१२७४**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, बँकांचा, हित संबंधितांना सदर जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, **मौजे धुळे येथील धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. ३९३/२ पैकी प्लॉट नं. ४४ चे एकूण क्षेत्र १५० चौ. मी. यापैकी दक्षिणेकडील भागाचे क्षेत्र ९० चौ. मी. बखळ प्लॉट त्यांची चतु:सिमा नकाशा रेकॉर्ड प्रमाणे..**

येणे प्रमाणे मिळकत ही जुबैर अहमद मुख्तार अहमद शेख यांचे नावे असून त्यांनी अन्सारी मुहम्मद शोएब मुहम्मद युसुफ यांना दि. १७/०७/२०२६ रोजी विक्री केलेली आहे. तद्नंतर सदर मिळकत ही अन्सारी मुहम्मद शोएब मुहम्मद युसुफ रा. वडजाई रोड, रहेमत मस्जिदजवळ, कबीरगंज, धुळे यांनी आमचे पक्षकार यांच्यासोबत कायम खरेदीचा सौदा केला असून सदर बयाणापोटी रक्कम दिलेली आहे. मिळकतीचा खरेदीचा व्यवहार संबंधीत व्यक्ती पूर्ण करणार आहेत.

**तरी सर्वांना या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की,** सदर मिळकत संबंधी कोणाचाही कुठल्याही प्रकारे सौदा पावती, हक्क, हित, सबंध देणे घेणे, मालकी हक्क, भाडेपट्टा, व लीज, ताबा, गहाण, दान, बोजा, कर्ज, लीज, टाच वा वारस हक्क, खावटी म. जु. वगैरे कोणत्याही व कुठल्याही प्रकारे हक्क व अधिकार असल्यास सदर नोटीस जाहीर झाल्याचे (०७) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री प्रती सहीत आमचे ऑफिसात हरकती सादर कराव्यात. परस्पर जाहीर नोटीस वर्तमानपत्रावर असल्यास त्या ग्राह्य धरण्यात येणार नाही व हरकती न असल्यास आमचे पक्षकार सदर मिळकत निर्वेध व निर्बोज म्हणून खरेदी करतील. नंतर आलेल्या हरकती ह्या ग्राह्य धरल्या जाणार नाही. सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीत करण्यात आली आहे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.
धुळे दि. २४/०७/२०२६

**ॲड.परवेज निसार तांबोळी**
३५, अविष्कार कॉलनी, चाळीसगांव रोड, धुळे मो. ७०२०३८१३९४

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि. धुळे येथील सर्व्हे नं.१७१/२ पैकी प्लॉट नं.६८ चे क्षेत्र १९५ चौ.मी. यांसी चर्तु:सिमा पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.६६, दक्षिणेस : स.नं.१८ पैकी, उत्तरेस : प्लॉट नं.६७. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) बाळकृष्ण रामनाथ शर्मा, २) सौ.संगीता नितीन देव, ३) श्री.प्रशांत बाळकृष्ण जोशी, तिघे रा.देवपूर, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी नमूद कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीच्या बाबतीत सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, हिस्सा, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्युपत्र, पोटगी, अन्नवस्त्र, कोर्ट जप्ती, दावा, कोर्ट वाद, सॉल्व्हन्सी, आरक्षण, हितसंबंध, देणे घेणे, वगैरे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर मिळकती संबंधीत योग्य ते कागदपत्रानीशी प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. अन्यथा सदरची मिळकत पूर्णपणे निर्वेध व निर्बोज आहे असे समजून अथवा कोणाचे हक्क, हितसंबंध असल्यास ते त्यांनी जाणीपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही यांची नोंद घ्यावी. तसेच तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमान पत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर तसेच नमूद मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक :– २२/०७/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

## CHANGE NAME

I HAVE CHANGE MY NAME FROM **SAYYAD FARHAN KUTUBUDDIN** TO **SAYYAD FARHAN KUTUBUDDIN MANIYAR**
ADD- PLOT NO.125, CHALISGAON ROAD, NEAR NATIONAL SCHOOL, MUSLIM NAGAR, DHULE-424001. MAHARASHTRA

## CHANGE NAME

My Previous Name Was **SHAHENAZ BI LIYAKAT ALI** And My New Name Is **SHAHENAZ BANO ZAKIR KHAN**
Add - O Chalisgaon Road Near Munshi Masjid Muslim Nagar Dhule-424001 (M.S.)

## रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

## CHANGE NAME

My Previous Name Was **NAPISA BI ARAB BIG MIRZA** And My New Name Is **NAPISA BI SHARIF SHAIKH**
Add - Azad Nagarbaawdi Dhule-424001 (M.S.)

## CHANGE NAME

My Previous Name Was **SHE SHARIF SHE BANDU** And My New Name Is **SHARIF BANDU SHAIKH**
Add - Baawdi Azad Nagar Dhule-424001 (M.S.)

## जाहीर नोटीस

### धुळे येथील मे. अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात

दि. २४/०७/२०२६
जन्म–मृत्यू /रजि नं.४७/२०२६

अर्जदार
**समीर शफीक शेख**, उ. वय ३७ वर्षे,
रा. काझी प्लॉट वडजाई रोड, धुळे
मो. नं. 9075831292 ... अर्जदार

॥ विरुद्ध॥

**धुळे महानगरपालिका धुळे** ...जाबदेणार
(नोटीस निबंधक जन्म मृत्यू नोंद विभाग,महानगरपालिका,धुळे यांचेवर करण्यात यावी.)

ज्याअर्थी वरील अर्जदार **समीर शफीक शेख** यांची मुलगी नामे कुमारी आलिया समीर शेख यांचा **जन्म दि. ०४/०६/२०२० रोजी कफिल क्लिनीक चाळीसगांव रोड, धुळे ता. जि.** धुळे येथे झालेला असून त्यांची धुळे महानगरपालिका धुळे येथील दप्तरी नोंद नसल्याने व राहून गेल्याने जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३ अन्वये आज रोजी अपर तहसिलदार धुळे शहर यांचे न्यायालयात जन्माची नोंद मा. निबंधक सो. जन्म मृत्यू नोंदणी विभाग, धुळे महानगरपालिका धुळे यांचे दप्तरी लावणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे. ज्या अर्थी अर्जदार यांची मुलगी याचा जन्म दि. ०४/०६/२०२० ही **जन्म**/मृत्यू तारीख असून शासकीय कामी जन्म दाखल्याची गरज असल्याचे म्हटले आहे. त्यासाठी खालील प्रमाणे पुरावे जोडलेले आहेत.

१) आधारकार्ड, रेशनकार्ड, पॅनकॉर्ड.
२) वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला.
३) विज पावती, करपावती.
४) लसीकरणाचा पुरावा, रुग्णालय नोंदी

त्याअर्थी वरीलप्रमाणे नोंद करणेस कोणाचीही काही एक तक्रार/हरकत असल्यास त्यांनी सदर अर्जाचे चौकशीचे कामी उपरोक्त न्यायालयात दि. ०५/०८/२०२६ पावेतो स्वत: अगर वकिलामार्फत धुळे येथील मे. अपर तहसिलदार सो. धुळे शहर यांचे समक्ष हजर राहावे व आपले म्हणने, तक्रार व लेखी हरकत सादर करावी. अन्यथा कोणत्याही प्रकारे हरकत न आल्यास सदर कामी चौकशी होवून अर्जदाराचे नावाने जन्म/मृत्यू नोंद करुन घेण्याकामी योग्य ते आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस कोर्टाचे सही शिक्क्यानिशी आज रोजी प्रसिद्धीस दिली असे..

आदेशावरुन
सही...
**(वैशाली हिंगे)**
अपर तहसिलदार धुळे शहर

## टायटल व्हेरिफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व हितसंबंधी व वित्तीय संस्था, यांना या जाहीर नोटीसीने आमचे पक्षकार यांचेतर्फे ॲड.बाळासाहेब अमूलराव पवार रा. धुळे यांचे मार्फत कळविण्यात येते की,

आमचे पक्षकार **सौ. पल्लवी योगेश पाटील** रा. छावडी ता. साक्री जि. धुळे (विकत घेणार) यांनी **श्री. सुधाकर गंजीधर देवरे व श्री. प्रकाश गंजीधर देवरे** रा. भोकर ता. जि. धुळे (विक्री करणार) यांचे मालकीची मौजे धुळे ता. जि. धुळे येथील धुळे महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नंबर ४९५/२/४/ब/१+४९५/२/४ यांसी विस्तारीत सिटी सर्व्हे नंबर १०३७६/२ पैकी प्लॉट नंबर १८ चे क्षेत्र ११४.३७ चौ. मी. बखळ प्लॉट यास चतु:सिमा पुर्वेस प्लॉट नं. १७, पश्चिमेस : प्लॉट नं. १९, दक्षिणेस : लागू स. नं./सि. स. नं. १०३८५, उत्तरेस : ९ मी. रस्ता.

ही मिळकत खरेदीचा सौदा मिळकत मालक (विक्री करणार) व आमचे पक्षकार (विकत घेणार) यांचेत झालेला असून मिळकत मालक यांना आमचे पक्षकार यांनी बयाणा रक्कम देखील अदा केली आहे. सदर मिळकतीवर कोणताही बोजा नाही. व मिळकतीचे टायटल क्लीयर आहे असे प्रत्येक विक्री करणार यांचे म्हणणे आहे..

सबब उपरोक्त मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा मालकी हक्क, बोजा, गहाण, भाडेपट्टा, टांच, जप्ती, खरेदी विक्री करार, सौदा पावती, हस्तांतरण, हिस्सा, अधिकार, बक्षिस, वारस हक्क, कोर्ट केसेस, हितसंबंध,असल्यास व नियोाजित व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत आमचेकडे भेटून लेखी मुळ कागदपत्रासह हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचेवर बंधनकारक राहणार नाही. मिळकत ही निर्वेध व बिनबोजाची व कोणचाही हितसंबंध नाही असे गृहीत धरुन खरेदी करतील. परस्पर वर्तमानपत्राद्वारे घेतलेली हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहिती व कागदपत्र, अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. स्थळ – धुळे, दि. २३/०७/२०२६.

**ॲड.बाळासाहेब अमूलराव पवार,** मो.९४२३२३२९०४
ॲडव्होकेट व नोटरी (भारत सरकार)
ऑफिस : अप्पर ग्राउंड फ्लोअर गाळा नंबर ५, फॉरच्युन प्लाझा, गणपती रोड, जैन मंदिराच्या शेजारी, शिवतिर्थ व संतोषीमाता चौक जवळ, धुळे

## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरीफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतींचे वर्णन-** तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी जि.प. व ता.प.स धुळे पैकी धुळे म.न.पा. हद्दीतील मौजे वलवाडी येथिल स.नं.४९ पैकी प्लॉट नं.४१ चे एकूण क्षेत्र २७९.०० चौ.मी. यास विस्तारित सि.स.नं.१७५० सत्ताप्रकार क चे एकूण क्षेत्र २९४.०० चौ.मी. यापैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र १३९.४० चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतु:सिमा

पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.४८,
दक्षिणेस : प्लॉट नं.४१ पैकी भाग, उत्तरेस : प्लॉट नं.३७

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल संदेश सुधाकर पाटील यांनी मिळकतीचे मालक मयूरी राजेश पाटील व राजेश भिका पाटील रा.फागणे, ता.जि.धुळे यांचेशी सौदा केलेला आहे. सबब तमाम लोकांना या टायटल व्हेरीफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी–विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ७ दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची टायटल व्हेरिफिकेशन नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दि.२४/०७/२०२६.

**ॲड.मंगेश बी.सोनवणे**
ऑफिस– एस.२, गुरुदत्त संकुल, जमनागीरी रोड, धुळे.
**मो.नं.९४०४७३६७९६**

## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, शासकीय, निमशासकीय संस्था व सावकार यांना या टायटल व्हेरीफीकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतींचे वर्णन-** तु.जि.धुळे पो.तु.ता.धुळे पैकी जि.प. व ता.प.स धुळे पैकी धुळे म.न.पा. हद्दीतील मौजे वलवाडी येथील स.नं.१३२/१ पैकी प्लॉट नं.१०७ चे एकूण क्षेत्र १५०.०० चौ.मी., १६१४ चौ.फुट, बखळ प्लॉट. यासी चतु:सिमा

पुर्वेस : प्लॉट नं. १०६, पश्चिमेस : प्लॉट नं. १०८
दक्षिणेस : गट नं. ९९, उत्तरेस : ०९ मी. रस्ता.

येणेप्रमाणे वर्णन असलेली मिळकतीचा आमचे अशिल यांनी मिळकतीचे मालक दामोदर पर्वत पाटील यांचेशी सौदा केलेला आहे. सबब तमाम लोकांना या टायटल व्हेरीफिकेशन नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लिज, लिन, लिव्ह अॅण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, खरेदी–विक्री, न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत खालील नमूद पत्यावर पुराव्यानिशी लेखी हरकती नोंदवाव्यात. ०७ दिवसानंतर आलेल्या हरकती, लेखी पुराव्याशिवाय घेतलेल्या हरकती ग्राहय धरण्यात येणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत ही निर्बोज व हस्तांतरणीय आहे.

सदरची टायटल व्हेरीफिकेशन नोटीस आमचे पक्षकाराने दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दि.२४/०७/२०२६.

**ॲड.मंगेश बी.सोनवणे**
ऑफिस– एस.२, गुरुदत्त संकुल, जमनागीरी रोड, धुळे.
**मो.नं.९४०४७३६७९६**

## जाहीर नोटीस

या सूचनेद्वारे सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते/इशारा दिला जातो की, माझा अशिल खालील परिशिष्ठात नमूद जमीन मिळकत खुशखरेदी किंवा भाडेपट्टा तत्त्वावर संपादित करण्याचा विचार करीत आहे आणि सदर जमीन संपादित करण्यासाठी संबंधित मालकांशी वाटाघाटी सुरू आहेत, ज्यांनी असे दर्शविलेले आहे कि त्यांना संबंधित मालमत्ता हस्तांतरित करण्याचा अधिकार आहे व सदर मालमत्तेवर टीडीआर (विकास हक्कांचे हस्तांतरण), एफएसआय (फ्लोअर स्पेस इंडेक्स) अधिकार, गहाणखत, भेटवस्तू, देवाणघेवाण, मृत्युपत्र, विक्री करार, असाइनमेंट, वाटप, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, जमीन वापर परवाना, शुल्क, प्रोबेट, उत्तराधिकार प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र, कुटुंब व्यवस्था/वसाहत, सुविधा, देखभाल, न्यायालयाचा आदेश/डिक्री, विकास हक्क, संयुक्त उपक्रम प्रकल्प किंवा कोणत्याही स्वरूपाचे किंवा उद्देशाचे इतर कोणतेही भार, बोजा नाही आणि ती पूर्णपणे विक्रीयोग्य/भाडेपट्ट्याने देण्या योग्य आहेत. अशा प्रकारे जमीन मालकांनी आमच्या अशिलाशी विक्री/भाडेपट्टा आणि अन्य पद्धतीने हस्तांतरण कारण्याकरिता आमच्या अशिलाशी वाटाघाटी सुरू केल्या आहेत.

या खाली नमूद केलेल्या जमिनीवरील कोणत्याही स्वरूपाचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा किंवा दावा असलेली कोणतीही व्यक्ती ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत त्यांचे/तिचे/तिचे हक्क, मालकी हक्क, दावा आणि हितसंबंध सिद्ध करण्यासाठी संबंधित कागदपत्रांसह अधोस्वाक्षरीकाराकडे त्यांचे आक्षेप नोंदवू शकते. जर अशा वेळेत असा कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही, तर आमचा अशिल सदर व्यवहाराबाबत पुढे जातील आणि प्रस्तावित व्यवहारावर कोणत्याही व्यक्तीचा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून आणि जरी असा आक्षेप अस्तित्वात असला तरी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे गृहीत धरले जाईल व व्यवहार पूर्ण केला जाईल. त्यानंतर कोणत्याही स्वरूपाचे दावे, आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत.

**परिशिष्ट**

तुकडी धुळे, पोट तुकडी तालुका साक्री, दुय्यम निबंधक साक्री यांचे हद्दीतील, जिल्हा परिषद धुळे, पंचायत समिती साक्री व ग्राम पंचायत नाडसे, गांव मौजे नाडसे, तालुका साक्री, जिल्हा धुळे या गावातील शेतजमीन मिळकती खालील प्रमाणे; गट क्र.९५/१, गट क्र.९५/२, गट क्र.९५/३, गट क्र.९५/४, गट क्र.९६, गट क्र.१०७/१/१/१, गट क्र.१०७/१/१/२, गट क्र.१०७/१/२, गट क्र.१०२/२, गट क्र.१०७/३, गट क्र.१०७/४/१, गट क्र.१०७/४/२, गट क्र.१०७/५/१, गट क्र.१०७/५/२, गट क्र.८८/१/अ, गट क्र.८८/१/ब, गट क्र.८८/२/१/१, गट क्र.८८/२/१/१/१/अ, गट क्र.८८/२/१/१/१/ब, गट क्र.८८/२/१/२/२, गट क्र.८८/२/२, गट क्र.८९/१, गट क्र.८९/२, गट क्र.९०/१, गट क्र.९०/२, गट क्र.९०/३, गट क्र.९१/१, गट क्र.९१/२, गट क्र.९२, गट क्र.९३/१, गट क्र.९३/२, गट क्र.९३/३, गट क्र.९४/१, गट क्र.९४/२, गट क्र.९७, गट क्र.९८, गट क्र.८३, गट क्र.८५, गट क्र.८७/१, गट क्र.८७/२, गट क्र.८७/३, गट क्र.९९/१, गट क्र.९९/२, गट क्र.९९/३, गट क्र.९९/४, गट क्र.१००, गट क्र.१०१/१/२, गट क्र. १०१/२/१/पै, गट क्र.१०१/२/३, गट क्र.१०१/२/२, गट क्र.१०१/३, गट क्र.१०२/१/१/१, गट क्र.१०२/१/१/२, गट क्र.१०२/१/१/३, गट क्र.१०२/१/२, गट क्र.१०२/२/१/अ, गट क्र.१०२/२/१/ब, गट क्र.१०२/२/२, गट क्र.१०२/२/३, गट क्र.१०२/२/४, गट क्र.१०२/२/५, गट क्र.१०४/१, गट क्र.१०४/२/अ, गट क्र.१०४/२/ब, गट क्र.१०४/३, गट क्र.१०५/१, गट क्र.१०५/२, गट क्र.१०८, गट क्र.१२५/१/अ, गट क्र.१२५/२, गट क्र.१२५/२/१, गट क्र.१२५/२/२, गट क्र.१२५/२/३, गट क्र.१२६/१, गट क्र.१२६/२/१, गट क्र.१२६/२/२, गट क्र.१२६/३/१, गट क्र.१२६/३/२, गट क्र.१२७/१, गट क्र.१२७/२, गट क्र.१२८/१, गट क्र.१२८/२, गट क्र.१२९/१, गट क्र.१२९/२, गट क्र.१२९/३, गट क्र.१३०, गट क्र.१३१, गट क्र.१३२, गट क्र.१३३/१/१, गट क्र.१३३/१/२, गट क्र.१३३/२, गट क्र.१३४/१, गट क्र.१३४/२, गट क्र.१३४/३, गट क्र.१३४/४, गट क्र.१३५/१/अ, गट क्र.१३५/१/ब, गट क्र.१३५/२.

गट एकूण क्षेत्र–१४२ हेक्टर. ६७१० आर.

येणेप्रमाणे शेतजमीन मिळकती, त्यातील सर्व हक्क, हितसंबध, जाणे–येणेचे रस्त्याचे, वहीवाटीचे, हवा–पाण्याचे सर्व हक्क, अधिकार, हितसंबंधासह काही एक राखून न ठेवता अशी दरोबस्त मिळकत.

दिनांक :– २४/०७/२०२६.

**ॲड.डी.के.पोद्दार**
(शिक्का)
कार्यालय:– बी–००१, जीएफ, प्रॉस्पेरिटी टॉवर, सिक्का कार्मिक ग्रीन, सेक्टर–७८, नोएडा, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली, पिन:– २०१३०७
**मो.नं.९९५८००६९१२**

## जाहीर नोटीस

या सूचनेद्वारे सर्वसामान्य जनतेला कळविण्यात येते/इशारा दिला जातो की, माझा अशील खालील परिशिष्ठात नमूद जमीन मिळकत खुशखरेदी किंवा भाडेपट्टा तत्त्वावर संपादित करण्याचा विचार करीत आहे आणि सदर जमीन संपादित करण्यासाठी संबंधित मालकांशी वाटाघाटी सुरू आहेत, ज्यांनी असे दर्शविलेले आहे कि त्यांना संबंधित मालमत्ता हस्तांतरित करण्याचा अधिकार आहे व सदर मालमत्तेवर टीडीआर (विकास हक्कांचे हस्तांतरण), एफएसआय (फ्लोअर स्पेस इंडेक्स) अधिकार, गहाणखत, भेटवस्तू, देवाणघेवाण, मृत्युपत्र, विक्री करार, असाइनमेंट, वाटप, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, जमीन वापर परवाना, शुल्क, प्रोबेट, उत्तराधिकार प्रमाणपत्र, वारसा प्रमाणपत्र, कुटुंब व्यवस्था/वसाहत, सुविधा, देखभाल, न्यायालयाचा आदेश/डिक्री, विकास हक्क, संयुक्त उपक्रम प्रकल्प किंवा कोणत्याही स्वरूपाचे किंवा उद्देशाचे इतर कोणतेही भार, बोजा नाही आणि ती पूर्णपणे विक्रीयोग्य/भाडेपट्ट्याने देण्या योग्य आहेत. अशा प्रकारे जमीन मालकांनी आमच्या अशीलाशी विक्री /भाडेपट्टा आणि अन्य पद्धतीने हस्तांतरण कारण्याकरिता आमच्या अशिलाशी वाटाघाटी सुरू केल्या आहेत.

या खाली नमूद केलेल्या जमिनीवरील कोणत्याही स्वरूपाचा हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, ताबा किंवा दावा असलेली कोणतीही व्यक्ती ही सूचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत त्यांचे/तिचे/तिचे हक्क, मालकी हक्क, दावा आणि हितसंबंध सिद्ध करण्यासाठी संबंधित कागदपत्रांसह अधोस्वाक्षरीकाराकडे त्यांचे आक्षेप नोंदवू शकते. जर अशा वेळेत असा कोणताही आक्षेप प्राप्त झाला नाही, तर आमचा अशिल सदर व्यवहाराबाबत पुढे जातील आणि प्रस्तावित व्यवहारावर कोणत्याही व्यक्तीचा कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून आणि जरी असा आक्षेप अस्तित्वात असला तरी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे गृहीत धरले जाईल व व्यवहार पूर्ण केला जाईल. त्यानंतर कोणत्याही स्वरूपाचे दावे, आक्षेप स्वीकारले जाणार नाहीत.

**परिशिष्ट**

तुकडी धुळे, पोट तुकडी तालुका साक्री, दुय्यम निबंधक साक्री यांचे हद्दीतील, जिल्हा परिषद धुळे, पंचायत समिती साक्री व ग्राम पंचायत कासारे, गांव मौजे कासारे, तालुका साक्री, जिल्हा धुळे या गावातील शेतजमीन मिळकती खालील प्रमाणे; गट क्र.८६९, गट क्र.८७०/१, गट क्र.८७०/२, गट क्र.८७१/१, गट क्र.८७१/२, गट क्र.८७१/३, गट क्र.८७१/४, गट क्र.८७२/१, गट क्र.८७२/२, गट क्र.८७२/३, गट क्र.८७२/४, गट क्र.८७३, गट क्र.८७४/१, गट क्र.८७४/२/१, गट क्र.८७४/२/२, गट क्र.८७५, गट क्र.८७६/१, गट क्र.८७६/२, गट क्र.८७६/३ गट क्र.८७७/१, गट क्र.८७७/२, गट क्र.८७७/३, गट क्र.८७७/४, गट क्र.८९४, गट क्र.८९५/१, गट क्र.८९५/२, गट क्र.८९७/१, गट क्र.८९७/२/अ, गट क्र.८९७/२/ब, गट क्र.८९७/३, गट क्र.८९८/१, गट क्र.८९८/२, गट क्र.८९८/३, गट क्र.८९८/४, गट क्र.८९९, गट क्र.९००/१, गट क्र.९००/२, गट क्र.९०१/अ, गट क्र.९०१/ब, गट क्र.९०१/क, गट क्र.९०१/ड, गट क्र.९०९, गट क्र.९१०/१, गट क्र.९१०/२. एकूण क्षेत्र– ७६ हेक्टर. ११०७ आर.

येणेप्रमाणे शेतजमीन मिळकती, त्यातील सर्व हक्क, हितसंबध, जाणे–येणेचे रस्त्याचे, वहीवाटीचे, हवा– पाण्याचे सर्व हक्क, अधिकार, हितसंबंधासह काही एक राखून न ठेवता अशी दरोबस्त मिळकत.

दिनांक :– २४/०७/२०२६.

**ॲड.डी.के.पोद्दार**
(शिक्का)
कार्यालय:– बी–००१, जीएफ, प्रॉस्पेरिटी टॉवर, सिक्का कार्मिक ग्रीन, सेक्टर–७८, नोएडा, राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली, पिन:– २०१३०७
**मो.नं.९९५८००६९१२**

## पान १ वरुन

## पेपरफुट रोखण्यासाठी पुढील आठवड्यात विधेयक

करण्यासाठी विधेयक आणण्यास कॅबिनेटची मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे, पुढील आठवड्यातच हे विधेयक संसदेत संमत होणार आहे.

### नव्या विधेयकात काय?

नव्या विधेयकानुसार, पेपर फुटीसंदर्भातील संघटीत गुन्हेगारी प्रकरणात दहा वर्षे कारावास आणि दहा कोटी रुपयांच्या दंडाची शिक्षा ठोठावण्यात येणार आहे. तसेच, फास्टट्रॅक कोर्टात हे प्रकरण चालवले जाईल आणि तीन महिन्यात सुनावणी पूर्ण करण्यात येईल, अशीही तरतूद असणार आहे.

### सीजेपीच्या दोन मागण्या मान्य

सीजेपी प्रवक्त्यांची जे. पी. नड्डांसोबत बैठक घेऊन आंदोलन आणि मागण्यांबाबत चर्चा झाली. जे. पी नड्डा यांच्याकडे आम्ही तीन मागण्या ठेवल्या. त्यामध्ये पहिली मागणी म्हणजे केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेण्यात यावा, त्यामध्ये कुठलीही तडतोड केली जाणार नाही. यासह मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटींची आर्थिक मदत, तसेच २० जुलै रोजी संसद परिसरात झालेल्या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवरील दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घ्यावेत, या प्रमुख तीन मागण्या कॉक्रोच जनता पार्टीने सरकारपुढे मांडल्या आहेत. त्यावेळी, सरकारने दोन मागण्यांबाबत सरकार सकारात्मक आहे. मात्र, धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याबाबत निर्णय घेण्यासाठी उद्या दुपारपर्यंत वेळ मागितला असल्याचे कॉकरोच जनता पार्टीचे प्रवक्ते सौरव दास यांनी माध्यमांना सांगितले.

## दादरला विद्यार्थी एकवटले दिल्लीच्या आंदोलनास पाठींबा

एक भाग म्हणून राष्ट्रगीत गायनाचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आल. त्याचे आयोजन आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता आणि आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. दिल्लीतील पेपरफुटी प्रकरण आणि विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात विविध ठिकाणी आंदोलन होत असताना, मुंबईतील शिवाजी पार्कमध्ये सुरू झालेले हे आंदोलनही विशेष चर्चेचा विषय ठरत असून, याकडे राजकीय आणि सामाजिक वर्तुळाचे लक्ष लागले आहे. रविवारी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे तर्फे संयुक्त मोर्चा काढण्यात येणार आहे. त्यात पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे, राज ठाकरे यांच्यासह या दोन्ही पक्षांचे नेते सहभागी होणार आहेत. पालकांनी या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## हिमाचल मध्ये दरड कोसळली

उपचारासाठी रुग्णालयात नेण्यात आले. प्रशासनाकडून मदत आणि बचाव कार्य सुरू असून मृतांची ओळख पटवण्यासाठी आणि अपघाताचे कारण निश्चित करण्यासाठी सखोल तपास सुरू आहे. चंबा जिल्ह्यातील पांगी खोऱ्याला जोडणाऱ्या रस्त्यावर मोठे भूस्खलन झाले आहे. सतरुंडी आणि राणीकोट नाल्यांजवळील भूस्खलनामुळे पांगी खोऱ्याकडे जाणारा रस्ता पूर्णपणे बंद झाला असून वाहतूक ठप्प झाली आहे. चुराहचे सहाय्यक जिल्हाधिकारी राजेशकुमार जरियाल यांनी सांगितले की, सततच्या मुसळधार पावसामुळे सतरुंडी नाला आणि राणी कोटजवळ मोठा भूस्खलन होऊन पांगी खोऱ्याला जोडणारा सच पास रस्ता बंद झाला आहे. रस्ता बंद झाल्यामुळे वाहतुकीवर परिणाम झाला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची यंत्रसामग्री घटनास्थळी पाठवण्यात आली आहे. रस्ता पूर्ववत करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. रस्ता वाहतुकीसाठी पुन्हा खुला होताच लोकांना सूचित केले जाईल. खराब हवामानात अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## सोनम वांगचुक यांचे उपोषण मागे

रोखण्यासाठी कायदा आणणार, फास्टट्रॅक कोर्ट आणि कठोर शिक्षेची तरतूद करण्यासंदर्भात माहिती दिली. तर आपल्या मागण्या पूर्ण करण्याचे आश्वासन सरकारकडून मिळाल्यानंतर वांगचुक यांनी आपले उपोषण सोडले. यावर आता पंतप्रधान मोदींनी त्यांच्या या निर्णयावर प्रतिक्रिया दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इन्स्टाग्रामवर पोस्ट करत म्हटले आहे की, मी सोनम वांगचुक यांना आवाहन करतो की, त्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आपली दैनंदिन दिनचर्या सुरू ठेवावी आणि लवकरात लवकर आपले पुर्वीचे वजन पुन्हा मिळवावे. सोनम वांगचुक निरोगी राहोत, अशी मी देवाकडे प्रार्थना करतो. असे पंतप्रधान मोदी पोस्टमध्ये म्हणाले आहे.

### वांगचुक यांनी सोडलं उपोषण

केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा आणि केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्रसिंह यांनी भेट घेतल्यानंतर सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला. नीट पेपरफुटी विरोधात जंतरमंतर येथे सीजेपीने सुरू केलेल्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी त्यांनी २८ जून रोजी उपोषण सुरू केले होते. दरम्यान, प्रकृती खालावल्यानंतर सोनम यांना सफदरजंग रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर, दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांना मेदांता रुग्णालयात दाखल करण्यात आले. सोनम वांगचुक यांनी एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले, मी केंद्रीय मंत्री जेपी नड्डा आणि डॉ. जितेंद्र सिंह, तसेच लेह-लडाख सर्वोच्च समितीच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत उपवास सोडला. यापूर्वी, विविध राजकीय पक्षांच्या ६५ खासदारांनी मला भेटून किंवा पत्र लिहून उपवास सोडण्याचा आग्रह केला होता. देशातील संभाव्य हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर आणि विविध अटींवर दीर्घ चर्चा केल्यानंतर हे करण्यात आले. मी लवकरच एका वेगळ्या व्हिडिओमध्ये या अटींविषयी सविस्तर माहिती देईन. तोपर्यंत, कोणताही हिंसाचार टाळण्यासाठी आपण सर्वांनी सतर्क राहावे, असे मी आवाहन करते.

### मोदींचा विद्यार्थ्यांना व्हिडिओ संदेश

यापूर्वी, पंतप्रधान मोदींनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ संदेश जारी करून, पेपरफुटी रोखण्यासाठी मोठी पावले उचलल्याची माहिती देशातील तरुण, विद्यार्थी आणि पालकांना दिली. पंतप्रधान मोदी म्हणाले की, मला माहित आहे की प्रश्नपत्रिका फुटणे ही किरकोळ बाब नाही. लाखो विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसाठी ही एक अत्यंत क्लेशदायक घटना आहे. त्यामुळे गेल्या अडीच महिन्यांत प्रश्नपत्रिका फुटीच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. गुन्हेगारांना पकडण्यात आले असून ते तुरुंगात आहेत. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये, हे सुनिश्चित करणे ही आमची सर्वात महत्त्वाची जबाबदारी होती.

## दगड मारून जखमी केले कारावास आणि दंडाची शिक्षा

मात्र, या गोष्टीचा राग आल्याने आरोपी नरेंद्र वाघ याने महेश पाटील यांना अवाच्य भाषेत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता त्याने फिर्यादीस हाताने व बुक्क्यांनी मारहाण करून थेट दगडाने डोक्यात मारून गंभीर दुखापत केली होती.याप्रकरणी सोनगीर पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा रजि. नं. ११०/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ३२३, ३२४ आणि ५०४ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला होता.सदर गुन्ह्याचा सखोल व तांत्रिक तपास सोनगीर पोलीस ठाण्याचे पो. हे. कॉ. नरेंद्रसिंग गिरासे व पो. कॉ. उन्मेष आळंदे यांनी केला. त्यांनी घटनेचे साक्षीदार, वैद्यकीय पुरावे व प्रत्यक्षदर्शींच्या साक्षी गोळा करून अवघ्या काही दिवसांत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.न्यायालयात सरकारी पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेला युक्तिवाद, वैद्यकीय अहवाल आणि पोलिसांनी सादर केलेले पुरावे ग्राह्य धरून मा. न्यायाधीश परवेश साहेब यांनी आरोपी नरेंद्र निंबा वाघ याला दोषी ठरवले.न्यायालयाने दि. २२ जून २०२६ रोजी अंतिम निकाल देत आरोपीस सहा महिने साधा कारावास व दहा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. सोनगीर पोलिसांच्या तत्पर तपासामुळे आणि भक्कम पुराव्यांमुळे पीडिताला न्याय मिळाला असून पोलीस पथकाचे कौतुक केले जात आहे.

## फसव्या जाहिरातीला दोघे बळी पडले

दहा ते बारा जणांनी दुर्गेश व भाऊ जयेश (वय २४) यांना शिवीगाळ, मारहाण केली. त्यांना बंदुकीचा धाक दाखवून त्यांच्याकडील ३० हजार रुपयांची रोकड लुटली, त्यानंतर लुटमार करणारे पसार झाले. या घटनेने घाबरलेल्या दोघा भावांनी घडलेला प्रसंग आपल्या कुटुंबियांना सांगितला. कुटुंबीयांच्या मदतीने दुर्गेश पाटील याने धरणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. तेथे गुन्हा दाखल होवुन तो निजामपूर पोलीस ठाण्याकडे वर्ग झाला. सहाय्यक निरीक्षक किरण बर्गे तपास करीत आहेत.

## पान १ वरुन

## छत्रपती शिवरायांचा एकवीस फुटी पुतळा स्थानापन्न

पूर्णाकृती पुतळ्यासह स्मारकाचे काम आ.अनुप अग्रवाल यांच्या संकल्पनेतून सुरू होते. शिवसेना (उबाठा गट) पदाधिकाऱ्यांनी विविध चुकीचे आरोप करत याबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. त्यात खंडपीठाने स्मारकाच्या कामाला स्थगिती दिली होती. त्यामुळे गेल्या सात महिन्यांपासून स्मारकाचे काम ठप्प होते. याबाबत महापालिका प्रशासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात महिनाभरापूर्वी याचिका दाखल करून ही स्थगिती उठविण्याची विनंती केली होती. महापालिकेच्या या याचिकेवर निर्णय देताना गेल्या बुधवारी दि.२२ सर्वोच्च न्यायालयाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या कामाला औरंगाबाद खंडपीठाने दिलेली स्थगिती उठविली. यामुळे या स्मारकाच्या कामाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानुसार आ.अग्रवाल यांच्या हस्ते आज स्मारकाच्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे विधिवत पूजन करून प्रतिष्ठापना करण्यात आली.

महापौर मायादेवी परदेशी, उपमहापौर ज्योत्सना पाटील, भाजप बेटी बचाव बेटी पढावच्या प्रदेश सहसंयोजिका अल्पा अग्रवाल, माजी महापौर तथा नगरसेविका कल्पना महाले, डॉ. माधुरी बोरसे-बाफना, भाजपचे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, गटनेत्या किरण कुलेवार, नगरसेविका योगिता कुटे, पूनम शिरसाट, वैभवी दुसाने, कृपेश नांद्रे, जयेश वावदे, भाजपचे महानगर सरचिटणीस शशी मोगलाईकर, पवन जाजू, उपाध्यक्ष अजय अग्रवाल, पृथ्वीराज पाटील, आकाश परदेशी, मराठा क्रांती मोर्चाचे पदाधिकारी सुधाकर बेंद्रे, भानुदास बगदे, राजेंद्र काळे, राजेंद्र इंगळे, राजेंद्र चव्हाण, विनोद जगताप, नैनेश साळुंके, रणजित भोसले, वैभव मराठे, प्रीतम काळे, विवेक बागूल, राजेश पवार, अमित भोसले, रजनीश निंबाळकर, अमोल मराठे, श्याम रायगुडे, मनोज ढवळे, वामन मोहिते, पप्पू माने, चंद्रकांत थोरात, प्रभाकर वाघ, विकी परदेशी, मयूर शार्दूल, अमोल सूर्यवंशी, संतोष परदेशी, संदीप बैसाणे, हेमंत लोणारी यांच्यासह शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विरोधकांचा विकासकामांमध्ये खोडा

आ.अग्रवाल म्हणाले, की छत्रपती शिवाजी महाराजांनी मुघलांशी सामना करत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी निर्माण केलेल्या राज्याच्या मातीत आपण आज श्वास घेत आहोत. महाराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या कणाकणात छत्रपती शिवरायांचे अस्तित्व आहे. त्यांच्यामुळे आपण आज या महाराष्ट्रात राहत आहोत. अशा प्रत्येक भारतीयाच्या मनातील जाणता राजाच्या स्मारकाला विरोध करणे आणि त्यासाठी छत्रपती शिवरायांच्या द्वेष्ट्यांकडून न्यायालयात याचिका दाखल करणे हा अतिशय दुर्दैवी प्रकार होता. यामुळे छत्रपतींच्या स्मारकाच्या कामाला उशीर तर झालाच शिवाय मोठ्या प्रमाणात कालापव्यय तसेच खर्च वाढला. हा वाढलेला खर्च स्मारकाला विरोध करणारे भरणार आहेत का ? असा सवालही आमदार अग्रवाल यांनी केला.

### धुळेकरांनीच आता जाब विचारावा

शहरातील आदिशक्ती श्री एकवीरामाता मंदिरासमोर साकारल्या जाणाऱ्या देशातील एकमेव ५१ शक्तिपीठाच्या कामालाही विरोधकांनी याचिका दाखल करत विरोध केला. त्यामुळे हे काम तर थांबलेच. शिवाय न्यायालयाने १२ लाख रुपये भरून त्रयस्थ संस्थेकडून सर्वेक्षणाचा आदेश दिला आहे. आता हे १२ लाख रुपये कोण भरणार? मी तर म्हणतो, ज्यांना असे वाटते, की हे काम चुकीचे आहे त्यांनी ते १२ लाख रुपये भरून सर्वेक्षणाद्वारे सिद्ध करून दाखवावे. मात्र, ते असे करणार नाहीत. शहरातील टॉवर गार्डनबाबतही असाच प्रकार घडला. शहरात सुरू असलेल्या विकासकामांमध्ये विनाकारण खोडा घालायचा, हा प्रकार आहे. याचा जाब आता धुळेकर नागरिकांनीच विरोधकांना विचारण्याची गरज असल्याचेही आ.अग्रवाल म्हणाले.

### जल्लोषात विधिवत प्रतिष्ठापना

तब्बल एकवीस फूट उंच असलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा हा पूर्णाकृती पुतळा दोन मोठ्या क्रेनच्या सहाय्याने तब्बल साठ ते सत्तर फूट उंचीवरील जागेत विराजमान करण्यात आला. यावेळी शहरातील शिवप्रेमींसह धुळेकर नागरिक आणि भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व हिंदुत्ववादी संघटनांचे कार्यकर्ते या सोहळ्याचे साक्षीदार ठरले. पुतळा विराजमान करण्यापूर्वी आ.अग्रवाल, महापौर परदेशी, अंपळकर, बेंद्रे आदींच्या हस्ते जागेचे शुद्धीकरण, पूजन करण्यात आले. यानंतर महाराजांचा पुतळा विराजमान करण्यात आला. यानंतर आ. अग्रवाल यांच्यासह सर्व उपस्थितांनी पूजन करून आरती केली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराजांचा जयजयकार करणाऱ्या घोषणांनी परिसर दणाणून गेला.

## नंदुरबार रेल्वे फाटका पलीकडे

कॉलनी व कोरीट नाका, गुरुकुल भागातील रहिवासी नागरिकांना मयत व्यक्तीच्या अंत्ययात्रेसाठी कसरत करावी लागते. उपनगर पोलीस ठाण्या प्रमाणेच रेल्वे फाटका पलीकडील अनेक वसाहतींसाठी स्वतंत्र नवीन आधुनिक स्मशानभूमी उभारण्याची आवश्यकता आहे. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर अंत्ययात्रेप्रसंगी नागरिकांचे हाल होत असतात. अनेक नातेवाईक बाहेर गावाहून रेल्वे अथवा बसने नंदुरबारला आल्या नंतर रेल्वे फाटका पलीकडे मयताच्या घरी जेमतेम पोहोचतात. मात्र तिथून अंत्ययात्रे साठी जाताना नागरिकांच्या हाल अपेष्टा होतात. पर्यावरणाच्या दृष्टीने अंत्य संस्कारा साठी लाकडावर होणारा खर्च थांबवून आधुनिक विद्युत दाहिनीची स्मशानभूमी उभारणे आवश्यक आहे. नंदुरबार जिल्हा निर्मिती होऊन २८ वर्षे झाली मात्र नागरिकांच्या सोयी सुविधेसाठी रेल्वे फाटका पलीकडील कोणत्याही शासकीय भूखंडावर नवीन आधुनिक स्मशानभूमी लवकरात लवकर उभारण्यात यावी. याकरिता नगर पालिकेने तातडीने निर्णय घेऊन ठराव पारीत करण्याची मागणी भाजपा कार्यकर्ते गिरीश नाथानी यांनी केली आहे. नंदुरबार शहरातील नवीन स्मशानभूमीच्या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री, नगर विकास मंत्री, पालकमंत्री, आमदार-खासदार यांना देण्यात आले आहे.या सर्व निवेदनांवर गिरीश नाथानी, महिला प्रतिनिधी जोली शहा यांच्यासह कमल उत्तमानी, सुंदर नाथानी, भरत माखिजा, ओम धनवाणी, हरीश मोटवानी, योगेश भक्त्यापूरी, परेश तुलसानी, भावेश मंगलानी, कृष्णा दुसेजा, दीपक पाटील, पुनम पाटील, विशाखा विष्णू पाटील आदी नागरिकांच्या सह्या आहेत. दरम्यान रेल्वे फाटका पलीकडे नवीन स्मशानभूमीचा निर्णय तातडीने मार्गी न लागल्यास तहसील कार्यालया समोरच मयत व्यक्तीचा अंत्यसंस्कार करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

## कुणाल पाटीलांचे विठ्ठलाकडे साकडे

पंढरपूरकडे शुक्रवार दि.२४ जुलै २०२६ रोजी रवाना झाला. तत्पूर्वी सकाळी मा.आ.कुणाल पाटील यांच्या हस्ते धुळे येथे महाप्रसादाची आणि वाहनाची विधीवत पुजा करण्यात आली. यावेळी त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. मा.आ.कुणाल पाटील यांनी याप्रसंगी पंढरीच्या श्री विठ्ठल रुख्मिणीला साकडे घातले. शेतकऱ्यांसाठी वरुणराजाने समाधानकारक पाऊस पाडावा, बळीराजाला भरघोस उत्पन्न येऊन त्यांच्या जीवनात सुखसमृध्दी येऊ दे, तसेच सर्वांना सुखी समाधानी ठेव! अशी प्रार्थना मा.आ.कुणाल पाटील यांनी केली. यांप्रसगी ज्येष्ठ नेते विकास रंवदळे,चिंचवार माजी सरपंच सोमनाथ पाटील, सामाजिक कार्यकर्ते धर्मराज बागुल, शांताराम बागुल,माजी सरपंच संतोष पाटील,अशोक बागुल, नवल पदमर, शांताराम मोरे, किशोर शिंदे, सुभाष मासुळे, जगन्नाथ बागुल, सुधाकर शिंदे, रावसाहेब शिंदे, ज्ञानेश्वर मोरे, भगवान हालोर, भरत हालोर, जितू बागुल, राजेंद्र वाघ, सनी शिंदे, किरण वाघ, मनोहर मोरे आदी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांच्या समर्थनार्थ रविवारी धुळ्यात मोर्चा

मोकळी करून देण्यासाठी धुळ्यातील युवाशक्ती आता एकत्रित येणार असुन विद्यार्थी पालक महाविद्यालयीन विद्यार्थी या मोर्चात सहभागी होणार असून रविवार दि २६ जुलै रोजी सकाळी १०.०० वा शिवाजी पुतळा ते गांधी पुतळा पर्यंत हा मोर्चा काढण्यात येणार असून सदर मोर्चात कुठल्याही पक्षाचा झेंडा नसणार असुन फक्त तिरंगा ध्वज प्रत्येकाच्या हातात असेल. या तिरंगा मोर्चा संदर्भात उद्या दि.२५जुलै रोजी गुलमोहर विश्रामगृह येथे सकाळी १०.०० वा.बैठकिचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीत सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन तिरंगा संघर्ष समिती वतीने करण्यात आले आहे.

## आझाद समाज पार्टीचे आज धरणे आंदोलन

धुळे, दि.२४- दिल्लीतील जंतरमंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या समर्थनार्थ धुळ्यात आझाद समाज पार्टी, भिम आर्मीच्या वतीने आज दि.२५ जुलै रोजी क्युमाईन क्लब समोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

शासकीय विश्राम गृहात घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेप्रसंगी दिलीप मोहिते, संजय चव्हाण, सागर चव्हाण, भाऊसाहेब शिरसाट, राहुल वाघ, दादा सोनवणे उपस्थित होते. नीट पेपर फुटी प्रकरणामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी दिल्लीत आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाच्या समर्थनार्थ आझाद समाज पार्टी, भिम आर्मीचे पदाधिकारीही सहभागी झाले आहेत. या आंदोलनांच्या समर्थनार्थ आज दि.२५ जुलै रोजी क्युमाईन क्लब समोर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. येत्या पंधरा दिवसांत आंदोलकांच्या मागण्यांबाबत काही निर्णय न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही पत्रकार परिषदेप्रसंगी देण्यात आला.


## निधन वार्ता

### किसान शिंदे



नंदुरबार, दि.२४ -शहरातील नेहरू पुतळा परिसरातील अपना रेस्टॉरंटचे संचालक किसन श्रावण शिंदे (वय ६७) यांचे वृद्धापकाळाने २२ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सुन, जावई, नातवंडे असा परीवार आहे. भिकन व संजय शिंदे यांचे ज्येष्ठ बंधू आणि चेतन शिंदे यांचे वडील होते.

### राग्रेश पटेल



धुळे, दि.२४- शहरातील चाळीसगाव रोड परिसरातील जय शंकर कॉलनीतील रहिवासी राग्रेश कन्हुभाई पटेल यांचे हृदयविकाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा आज दि.२६ जुलै रोजी सकाळी अकरा वाजता राहत्या घरापासून काढण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## हिंदु एकता आंदोलन पक्ष नाशिक वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम




**नाशिक, दि.२३- वृक्षारोपण प्रभाग २३ मध्ये ओंकारेश्वर महादेव मंदिर बजरंगवाडी परिसरात वृक्ष रोपण करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी, किरणसिंग पवार शहराध्यक्ष, युवा नेते प्रसाद बावरी, महिलाध्यक्ष प्रियंका अहिरराव, विजय पवार, कळवण तालुका अध्यक्ष गोपीचंद हिरे, रविसर पवार,पंचवटी विभाग प्रमुख मनोज मराठे, सरचिटणीस राजेंद्र नेरकर, उमेश पाटील ,अनिल जाधव आदि उपस्थित होते**

प्रभाग मध्ये गरजू बेघर कुटुंबीयांना महिलांना साडीचोळी किराणा सामान, शाळकरी मुलामुलींना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सायकली शहीद भगतसिंग द्वारका चौक श्री टेंबलाईमाता मंदिर प्रांगणात माजी आजी पदाधिकारी, दिवगत चे वारस यांचा भव्य सत्कार सन्मानपत्र शाल फूल देऊन करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात हिंदु सूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्यास रामसिंग बावरी तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास सुरेश तिगारे यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. दीपप्रज्वलन पत्रकार विश्वास मदाने, सुनील शर्मा निफाड, सीताराम गोसावी, बाळासाहेब चौधरी, गोपीचंद हिरे कळवण तालुकाध्यक्ष यांच्या शुभहस्ते करण्यात आले. वार्ताफलकाचे उद्घाटन रामसिंग बावरी यांचे हस्ते तर शाम पवार मा.अध्यक्ष यांनी श्रीफळ वाढविला. कार्यक्रमांचे सूत्र संचलन करणसिंग बावरी दक्ष न्यूज यांनी केले.

यावेळी सुरेश पवार बजरंग वाडी, पद्माकर खैरनार बजरंग वाडी, सीताराम गोसावी शिवपुरी चौक सिडको, दिनकर पवार एकता चौक, बाळासाहेब कऱ्हाड द्वारका, अशोक पंजाबी हरिहर बाग, शरद वाघ हरिहर बाग, सुरेश तिगारे जुने नाशिक, बाळासाहेब चौधरी हिरव, सोमनाथ खंदारे बुधवार पेठ, शशी हिरवे राममुक्ती चौक, संजय पाटेकर सिडको, दत्ता शिंदे द्वारका, अविनाश शिंदे अशोक स्तंभ, एस.के. कुलकर्णी इंदिरा नगर, भगवान पाटील एकता चौक, रवींद्र सोनजे महाराणा प्रताप चौक सिडको, सुनील शर्मा निफाड, गोपीचंद हिरे चणकापूर कळवण, कैलास हाडगे बुरुडगल्ली, बादल खिची ओझर, डोंगरे सिडको, महादू बेंडकुळे शहीद भगतसिंग चौक, प्रतापसिंग पवार संत कबीर नगर आदि उपस्थित होते.

दरम्यान सचिन पवार, काळे बजरंगवाडी, प्रकाश खिची, राजू शिकलकर पेठरोड, कैलास ताते, दीपक बोरसे द्वारका, किशोर बागमार, किरणसिंग पवार, प्रसाद बावरी, प्रियंका अहिरराव, अनिल जाधव, अतुल रयसिंग, राजेंद्र नेरकर, मनोज मराठे, जीवा पवार, देवा पवार, भूषण सदभैय्या, प्रतीक कसबे, राजू गाडगीळ, सोनू भोंड, उमेश पाटील, प्रकाश आहिरे, विजय पवार आदीचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी किशोर बागमार,समाजसेवक शशी हिरवे, विश्वास मदाने, नितीन खैरनार, सुरेश पवार यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग भाऊ बावरी यांनी मार्गदर्शन करतांना सांगितले हिंदु हित, हिंदुना सन्मान मिळवून देण्यासाठी हिंदु एकता आंदोलन पक्ष कटिबद्ध आहे. सभासद नोंदणी करून सदस्य होऊन हिंदु राष्ट्राचे कार्य करायला सिद्ध व्हा,समान नागरी कायदा लागू झालाच पाहिजे कारण भारत देशाला राष्ट्रीय एकता, अखंडता, समानता हवी असेल, लोकसंख्यावर नियंत्रण आणण्याचे असेल सक्तीचे कुटुंब नियोजन राबविणे गरज प्रतिपादन केली, रौप्य २५ वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान**


## स्मरणपुष्प

३६ वे पुण्यस्मरण  २९ वे पुण्यस्मरण



स्व.कुंदनमलजी प्रेमसुखजी पाटणी (स्वर्गवास-मंगळवार-गुरूपौर्णिमा १९८९)

स्व.श्रीमती कस्तुराबाई कुंदनमलजी पाटणी (स्वर्गवास-मंगळवार-गुरूपौर्णिमा १९९६)

- नतमस्तक -

संतोष कुंदनमल जैन (पाटणी)

कार्तिक संतोष जैन (पाटणी)

स्वप्नेश अनिल जैन (पाटणी)  विनोद हुकूमचंद जैन (पाटणी)
सुहास अनिल जैन (पाटणी)  पारस हुकूमचंद जैन (पाटणी)
मानस विनोद जैन (पाटणी)  अर्चित विनोद जैन (पाटणी)
मनुश्री पारस जैन (पाटणी)  तेजल पारस जैन (पाटणी)
रिदम स्वप्नेश जैन (पाटणी)

पाटणी परीवार,'शशिराज', शांतीनाथ नगर साक्रीरोड, धुळे.

**पाहिजेत**

स्कूल युनिफॉर्मच्या शोरूम करिता
मुले/मुली पाहिजेत
शिक्षण : १०वी/१२वी/पदवीधर
(कॉम्प्युटर नॉलेज आवश्यक)
CLEVER KEN FACTORY OUTLET
दु.नं. १९,एस.ए. मिशन कॉम्प्लेक्स,जयहिंद सिनिअर कॉलेजच्या बाजूला, देवपूर, धुळे
मो. 9987706455,9923597722

**डी. पी. इंजिनिअर्स**

BOSCH Invented for life
सुप्रसिद्ध बॉश कंपनीचे
वायपर ब्लेड्स



10% सूट
58 वर्षांची विश्वसनीय सेवा...
डी. पी. इंजिनिअर्स
अधिकृत बॉश डिझेल सर्व्हीस - A.7 उद्योग नगर, मुंबई आग्रा रोड, ध्रुव होंडा शोरूमच्या बाजुला, धुळे
Cell: 94030 88893 / 94222 89693

**पाहिजेत**

टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

**डिटीपी ऑपरेटर पाहिजेत**

इनडिझाईनमधे काम करु शकणारा डिटीपी ऑपरेटर चांगल्या पगारावर नेमणे आहे.
-: संपर्क :-
दै.आपला महाराष्ट्र
9422286496

**दुकान विकणे आहे**

शॉप नं. ११
फॉरचुन प्लाझा
संतोषी माता चौक
ओस्वाल बोर्डींग शेजारी,
अप्पर ग्राउंड फ्लोअर
-: संपर्क :-
8806950799

**पाहिजे**

किरकोळ कामासाठी -१
कंपाउंडर, नर्स - १
-: संपर्क :-
श्री.धन्वंतरी हॉस्पिटल
गल्ली नं. ४, महात्माजी हॉटेल समोर, धुळे.
9112159675

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्ट्रोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...

Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV  HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागु
श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०